https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -३५२ | रविवार दि.३० ऑगस्ट २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily | Marathi | Year-6th | Issue-352 | Sunday, Dt.30 August 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# सप्टेंबरच्या सुरुवातीलाच पावसाचा जोर वाढणार; मराठवाडा, विदर्भाची तूट कायम

मुंबई : प्रतिनिधी

महाराष्ट्रात यंदा मान्सूनची वाटचाल अपेक्षेप्रमाणे झालेली नसताना सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील काही भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. ४ आणि ५ सप्टेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि उत्तर मराठवाड्याच्या काही भागांत पावसाचे प्रमाण वाढण्याचा अंदाज आहे. मात्र, त्यानंतर पुन्हा पावसाची स्थिती कमकुवत होण्याची शक्यता असून, १० ते २४ सप्टेंबरदरम्यान महाराष्ट्रात पाऊस सरासरीपेक्षा कमी राहण्याचा अंदाज आहे.

विदर्भ, मराठवाड्यात तूट

दरम्यान, राज्यातील मराठवाडा आणि विदर्भ विभागांमध्ये पावसाची मोठी तूट कायम आहे. मराठवाड्यात आतापर्यंत सरासरीपेक्षा २७ टक्के कमी, तर विदर्भात २४ टक्के कमी पाऊस नोंदवला गेला आहे. जून आणि जुलै महिन्यात देखील पावसाने पाठ फिरवली होती. त्यामुळे राज्यात बहुतांश ठिकाणी पावसाची तूट आहे. ऑगस्ट महिन्यातही पावसाने अपेक्षित हजेरी न लावल्याने सप्टेंबरमधील काही दिवसांच्या पावसाकडे शेतक-यांचे लक्ष लागले आहे.

पूर्व विदर्भाला 'यलो अलर्ट'

दरम्यान, बंगालच्या उपसागरात निर्माण



होत असलेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम राज्यातील हवामानावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे हिंगोली, लातूर आणि नांदेड जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांसह पाऊस पडण्याचा अंदाज आहे. उर्वरित राज्यात ढगाळ हवामानासह हलक्या पावसाची शक्यता आहे.

बंगालच्या उपसागरात कमी दाबाची निर्मिती

पश्चिम बंगाल आणि बांगलादेशच्या किना-यालगत समुद्रसपाटीपासून सुमारे ७.६ किलोमीटर उंचीवर चक्राकार वा-यांची स्थिती निर्माण झाली आहे. या प्रणालीच्या प्रभावामुळे पश्चिम बंगाल आणि ओडिशाच्या किनारपट्टीलगत कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. त्याचा परिणाम पुढील काही दिवसांत मध्य भारतातील हवामानावर होण्याची शक्यता आहे.

पावसाची तूट कायम

२७ ऑगस्ट ते १० सप्टेंबरदरम्यान पूर्व भारतात चांगला पाऊस राहण्याची शक्यता आहे. याच काळात ४-५ सप्टेंबरदरम्यान मध्य भारत, विदर्भ आणि उत्तर मराठवाड्यात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. मात्र, १० सप्टेंबरनंतर महाराष्ट्रात पुन्हा पावसाचे प्रमाण कमी होण्याचा अंदाज असल्याने काही दिवसांचा वाढलेला पाऊस राज्यातील एकूण तूट भरून काढण्यासाठी पुरेसा ठरणार का, याकडे लक्ष लागले आहे.

# सोळा गावात पुरुष तर आठ गावांत महिला शेतकरी मित्र !

## महिला आरक्षणासाठी आठ गाव सोडत पध्दतीने !

### दहा सप्टेबर पर्यंत ईच्छुकांनी आपले अर्ज सादर करावे !

मानूर प्रतिनिधी ह्व

पोलीस मित्राच्या धरतीवर आता कृषी क्षेत्रात देखील शेतकरी मित्र म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली असुन शिरूर तालुक्यात चोवीस शेतकरी मित्र म्हणून निवड होणार असुन महिलांना देखील यात संधी मिळणार असुन आठ गावात त्यांच्यासाठी राखीव म्हणून सोडतीद्वारे निश्चित केले आहे . ईच्छुकांनी आपले अर्ज दहा सप्टेबर पर्यंत सादर करावेत असे आवाहन तालुका कृषी अधिकारी अमृत गांगुर्डे यांनी केले आहे .

शेतकरी मित्रांना शासनाकडून मानधन देण्यात येणार असल्याचे सांगितले गेले .

कृषी कर्मचारी थेट शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन मार्गदर्शन करतात मात्र कधी कधी एकाच वेळेस दोन किंवा त्याहून अधिक ठिकाणी जावे लागल्यास काही शेतकऱ्यांना त्यांची समस्या व प्रश्न पडल्यास त्याचे निराकरण करण्यास कृषी कार्यालयाकडे वेळ शिल्लक राहत

# चाकण येथून सुटका केलेल्या १३ वर्षीय अल्पवयीन पीडितेची वैद्यकीय तपासणी साठी फरफट

## दोन खाजगी सोनोग्राफी केंद्रांचा नकार

केज/प्रतिनिधी

युसुफवडगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार करण्यात आल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. पुण्यातील चाकण येथून पीडितेची सुटका केल्यानंतर तिच्या वैद्यकीय तपासणी दरम्यान मोठे हाल झाले असून,शहरातील दोन खाजगी निदान केंद्रांनी (सोनोग्राफी सेंटर्स) तपासणी नाकारल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.




काय घडली घटना?

पीडित मुलीचे दि. ७ जानेवारी २०२६ रोजी अपहरण झाले होते. पीडितेच्या आईने दिलेल्या तक्रारीवरून मुख्य आरोपी रोहन आणि त्याचे वडील अर्जुन,भाऊ करण व आई मीरा यांच्या विरुद्ध युसुफवडगाव पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा गु.र.नं.१०८/२०२६ दाखल करण्यात आला होता.सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे यांच्या

# शासकीय रुग्णालय हस्तांतरणासाठी चिंचोलीमाळी येथे आंदोलन

## विठ्ठल झाडे यांचे पाण्याच्या टाकीवर चढून 'शोले' स्टाईल आंदोलन



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन इमारत तयार होऊनही प्रशासनाकडून ती रुग्णसेवेसाठी हस्तांतरित न केल्यामुळे ग्रामस्थांना आरोग्य सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे.प्रशासनाच्या या मनमानी कारभारा विरोधात आणि लेखी आश्वासन देऊनही कारवाई न झाल्याने आक्रमक झालेले सामाजिक कार्यकर्ते विठ्ठल विनायक झाडे यांनी पाण्याच्या टाकीवर चढून तीव्र आंदोलन सुरू केले आहे.चिंचोली माळी येथे गेल्या ३ ते ४ वर्षांपासून प्राथमिक आरोग्य केंद्राची नवीन इमारत बांधून तयार आहे.मात्र,जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून झालेल्या कथित अनियमिततेमुळे ही इमारत लोक वापरा साठी हस्तांतरित करण्यात आलेली नाही.एकीकडे नवीन इमारत बंद धूळ खात पडली आहे,तर दुसरी कडे जुनी इमारत पूर्णपणे मोडकळीस आल्यामुळे रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत.


प्रशासनाकडून आश्वासनांची हवेत उधळण

या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी विठ्ठल झाडे यांनी दि. १३ एप्रिल २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. त्यानंतर दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी आत्मदहनाचा इशारा दिला असता, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कनिष्ठ अभियंत्यांनी दि.१४ ऑगस्ट २०२६ रोजी १२ दिवसांत उर्वरित कामे पूर्ण करून इमारत हस्तांतरित करण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र,दिलेली मुदत दि २७ ऑगस्ट रोजी संपूनही प्रशासनाने कोणतीही हालचाल केली नाही.

### तात्काळ हस्तांतरणाची मागणी

वारंवार पाठपुरावा करून आणि लेखी आश्वासने देऊनही रुग्णालय सुरू होत नसल्याने अखेर विठ्ठल झाडे यांनी तहसील कार्यालय,पोलीस ठाणे आणि पंचायत समिती ला आत्मदहनाचा इशारा देत पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन सुरू केले. जोपर्यंत रुग्णालय तात्काळ हस्तांतरित करून लोकार्पण केले जात नाही,तोपर्यंत मागे हटणार नाही, असा पवित्रा त्यांनी घेतला आहे.या आंदोलनामुळे प्रशासनाची चांगलीच पळापळ झाली असून, घटनास्थळी ग्रामस्थांची मोठी गर्दी जमली आहे.आरोग्य केंद्राची ही इमारत लवकरात लवकर सुरू करून ग्रामस्थांना दिलासा द्यावा,अशी तीव्र मागणी आता परिसरातून होत आहे.






दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )



संपादकीय....

# माणसांसाठी सण की सणांसाठी माणूस ?

बुद्धीच्या देवाचा उत्सव साजरा करताना बुद्धीचा, साध्या कॉमन सेन्सचा वापर का केला जात नाही? परंपरेचा अभिमान उठसूठ सांगणारे बांधव उत्सवांची धार्मिक, पवित्र परंपरा का पाळत नाहीत?

मानव हा उत्सवप्रिय प्राणी आहे असे म्हणतात. उत्सवांच्या मागे काही ना काही कारण असते. उदा. ऋतू बदलाची सुरुवात, पिकांच्या हंगामाचे दिवस, ऐतिहासिक घटना वगैरे. नेहमीच्या कष्टमय आणि रटाळ जीवनात असे उत्सव, सण रंगत आणतात, आनंद देतात आणि ते साजरे केल्यावर माणूस नव्या उत्साहाने पुढील जीवन जगायला सिद्ध होतो. भारतीयांची उत्सवप्रियता तर अफाटच आहे. आपल्याकडील बहुसंख्य उत्सवांना, सणांना काही ना काही पौराणिक, ऐतिहासिक आणि धार्मिक पार्श्वभूमी असल्याने ते भक्तिभावाने साजरे केले जातात. काही सण हे प्रादेशिक असतात. काही सण कुटुंबात साजरे केले जातात तर काही सार्वजनिक स्वरूपात साजरे केले जातात. परंतु, आपल्या जीवनात रंगत आणणाऱ्या, आनंद देणाऱ्या सण, उत्सवांचे, विशेषतः सार्वजनिक उत्सवांचे, स्वरूप गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणात बदलले असून ते जनतेला आनंद देण्याऐवजी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष यातना देणारे ठरत आहेत. त्यावर एक दृष्टिक्षेप टाकणे आणि चर्चा करणे आवश्यक ठरते.

सार्वजनिक सण-उत्सवांचे बदलते स्वरूप

ब्रिटिशांविरुद्ध स्वातंत्र्यलढ्यात लोकांमध्ये जागृती, एकजूट निर्माण करण्यासाठी महाराष्ट्रात लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर खरे तर या उत्सवाची तशी आवश्यकता उरली नव्हती. परंतु या उत्सवानिमित्त लोकांनी एकत्रित येणे, प्रबोधनात्मक आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचा आस्वाद घेणे होत असल्याने सार्वजनिक गणेशोत्सव लोकांनी चालूच ठेवले. रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंतीही सार्वजनिक स्वरूपात साजरी होत होती आणि होत आहे. नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि अन्य महापुरुषांच्या जयंतीही धुमधडाक्यात साजऱ्या होऊ लागल्या आहेत.

गेल्या काही दशकांपासून या सण-उत्सव-जयंती यांचे स्वरूप पूर्णतः बदलले आहे. त्यातील सोज्वळता, धार्मिकता, आदर हे सारे मागे पडू लागले आहे. आता डॉल्बी-डीजे, लेजर, नाशिक ढोल-ताशे, गॅस सिलिंडरपासून बनवलेल्या मोठ्या घंटा यांचा वापर होतो.

गुजरातमधून आलेला गरबा. उत्तरेकडील छटपूजाही आता महाराष्ट्रात जोर धरू लागली आहे. कावड यात्रा सुरू व्हावी अशी काही धर्माभिमानी लोकांची मागणी आहे. ईद-ए-मिलाद या हजरत महम्मद पैगंबर यांच्या जयंती उत्सवानिमित्त मुस्लिम बांधव बऱ्याच ठिकाणी मिरवणूक काढतात.

सार्वजनिक गणेशोत्सव, गरबा, जयंती यांना बरेचदा कोणत्या ना कोणत्या राजकीय नेत्याचे किंवा छोट्या-मोठ्या उद्योजकांचे प्रायोजकत्व लाभलेले असते. कधी कधी अंडरवर्ल्ड 'डॉन'सुद्धा या उत्सवांचे प्रायोजक, आश्रयदाते असतात. त्यामुळे उत्सवांना पैशाची कमतरता भासत नाही. परिणामी उत्सव अधिक खर्चिक झाले आहेत. प्रायोजकत्व आले की प्रायोजकांचे मोठमोठे बॅनर्स आलेच. शिवाय सजावटीवर आणि दिखाव्यांवर अफाट पैसा खर्च केला जाऊ लागला आहे. मूर्तींची उंची वाढू लागली आहे.

# ऊसतोड मजुराच्या मुलाची संघर्षातून भरारी-श्री.देवदत्त कदरे यांची राज्य उत्पादन शुल्क विभागात उपनिरीक्षकपदी निवड

## श्री.देवदत्त कदरे यांच्या संघर्षमय यशाने नागतळ्याच्या शिरपेचात मानाचा तुरा

आष्टी : परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, आर्थिक अडचणी कितीही मोठ्या असल्या, जबाबदाऱ्यांचा डोंगर कितीही असला आणि यशाचा मार्ग कितीही खडतर असला, तरी मनात ध्येयाची जिद्द, त्यासाठी अविरत मेहनत करण्याची तयारी आणि अपयशाने खचून न जाता सातत्याने प्रयत्न करण्याची चिकाटी असेल, तर यश निश्चितपणे मिळविता येते, हे नागतळा येथील श्री. देवदत्त सखुबाई रामदास कदरे यांनी आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखविले आहे. आष्टी तालुक्यातील कडा येथील श्रीराम उच्च माध्यमिक विद्यालयाचे सन २००४ चे माजी विद्यार्थी असलेले श्री. देवदत्त कदरे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागीय परीक्षा-२०२५ मधून राज्य उत्पादन शुल्क विभागात उपनिरीक्षक (फौजदार) पदावर निवड झाली आहे. नागतळा, ता. आष्टी, जि. बीड या गावातून राज्य उत्पादन शुल्क विभागात उपनिरीक्षकपदी निवड होणारे ते पहिले व्यक्ती ठरल्याने त्यांच्या या यशाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यांच्या यशाची बातमी समोर येताच नागतळ्यासह कडा, आष्टी आणि परिसरातील ग्रामस्थ, विद्यार्थी, पालक, शिक्षक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.




श्री. देवदत्त कदरे यांच्या यशाची कहाणी ही केवळ एका परीक्षेत मिळविलेल्या यशाची बातमी नाही, तर ग्रामीण भागातील एका सामान्य कुटुंबातील युवकाने अनेक वर्षे संघर्ष करून, परिस्थितीशी दोन हात करत आणि आपल्या ध्येयावर विश्वास ठेवून मिळविलेल्या यशाची प्रेरणादायी गाथा आहे. नागतळा या ग्रामीण भागातून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाची सुरुवात झाली. प्राथमिक शिक्षणापासून इयत्ता दहावीपर्यंतचे शिक्षण त्यांनी नागतळा येथे पूर्ण केले. ग्रामीण भागातील शैक्षणिक वातावरणात शिक्षण घेत असतानाच त्यांच्या मनात शिक्षणाच्या माध्यमातून पुढे जाण्याची आणि शासकीय सेवेत प्रवेश करण्याची इच्छा निर्माण झाली. त्यानंतर त्यांनी इयत्ता अकरावी व बारावीचे शिक्षण श्रीराम ज्युनिअर कॉलेज, कडा येथे घेतले. उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर शासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न त्यांनी अधिक दृढ केले आणि त्यासाठी स्पर्धा परीक्षेच्या तयारीचा मार्ग स्वीकारला.

शासकीय अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून त्यांनी पुणे गाठले. स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी पुणे येथे त्यांनी तब्बल सुमारे सात वर्षे अभ्यास केला. सात वर्षांचा कालावधी हा कोणत्याही स्पर्धा परीक्षार्थीसाठी मोठा असतो. या काळात अनेक वेळा यश हातातून निसटल्याची भावना निर्माण होऊ शकते, अनेक अडचणी समोर येऊ शकतात आणि आपले ध्येय साध्य होईल की नाही, असा प्रश्नही पडू शकतो. मात्र श्री. देवदत्त कदरे यांनी या कोणत्याही परिस्थितीसमोर हार मानली नाही. त्यांनी अभ्यासातील सातत्य कायम ठेवले. प्रत्येक टप्प्यावर स्वतःमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. ध्येय स्पष्ट असल्यामुळे त्यांच्या प्रयत्नांना दिशा मिळाली आणि हळूहळू त्यांच्या मेहनतीला यशाचे रूप मिळू लागले.

या सात वर्षांच्या अभ्यासाच्या काळात त्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानावर अवलंबून न राहता स्पर्धा परीक्षेच्या स्वरूपाचा सातत्याने अभ्यास केला. वेळेचे नियोजन, अभ्यासातील सातत्य आणि परीक्षेच्या तयारीबाबत गांभीर्य या बाबींना त्यांनी महत्त्व दिले. स्पर्धा परीक्षेत यश मिळविण्यासाठी दीर्घकाळ सातत्य राखणे आवश्यक असते. एक-दोन दिवसांचा उत्साह किंवा काही महिन्यांची तयारी पुरेशी नसते. हे लक्षात घेऊन त्यांनी दीर्घकाळ स्वतःला अभ्यासाशी जोडून ठेवले. परिस्थिती बदलण्याची वाट पाहण्याऐवजी उपलब्ध परिस्थितीतूनच मार्ग काढण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या यशामागील सर्वांत मोठी ताकद म्हणजे त्यांची सातत्यपूर्ण मेहनत असे म्हणावे लागेल. श्री. देवदत्त कदरे यांच्या संघर्षातील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे त्यांचा नोकरीसोबत सुरू असलेला अभ्यास. सध्या ते राज्य उत्पादन शुल्क विभाग, अहिल्यानगर येथे कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत आहेत. गेल्या चार वर्षांपासून ते विभागात आपली कर्तव्ये पार पाडत आहेत. शासकीय सेवेत काम करत असताना वेळेची शिस्त, कार्यालयीन जबाबदाऱ्या आणि कर्तव्याचे स्वरूप यामुळे स्वतःसाठी अभ्यासाचा वेळ काढणे हे मोठे आव्हान असते. त्यातच कुटुंबाचीही जबाबदारी असते. मात्र श्री. देवदत्त कदरे यांनी या सर्व जबाबदाऱ्यांचा समतोल साधत आपल्या पुढील ध्येयाचा पाठपुरावा सुरू ठेवला. नोकरी मिळाल्यानंतर अनेक जण मिळालेल्या पदावर समाधान मानतात; परंतु श्री. देवदत्त कदरे यांनी मात्र आपल्या मनातील मोठ्या ध्येयाचा पाठपुरावा थांबविला नाही. कॉन्स्टेबल म्हणून सेवा बजावत असतानाही त्यांनी उपनिरीक्षक होण्याचे स्वप्न जिवंत ठेवले आणि त्यासाठी पुन्हा अभ्यास सुरू ठेवला.

नोकरीची जबाबदारी पार पाडल्यानंतर मिळणाऱ्या मर्यादित वेळेचा योग्य उपयोग करून त्यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी केली. कामाचा थकवा, दैनंदिन जबाबदाऱ्या, कौटुंबिक जबाबदारी आणि अभ्यास यांचा मेळ घालताना त्यांना निश्चितच अनेक अडचणींचा सामना करावा लागला असेल; मात्र त्यांनी अभ्यासामध्ये खंड पडू दिला नाही. ध्येय मोठे असेल तर त्यासाठी वेळ निर्माण करावा लागतो, या भावनेने त्यांनी सातत्याने अभ्यास केला. अखेर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागीय परीक्षा-२०२५ मध्ये त्यांनी यश संपादन केले आणि उपनिरीक्षक पदावर निवड होऊन आपल्या प्रदीर्घ संघर्षाला यशस्वी पूर्णविराम दिला.

श्री. देवदत्त कदरे यांच्या यशाकडे पाहताना त्यांच्या कुटुंबाची पार्श्वभूमी विशेष उल्लेखनीय ठरते. त्यांचे वडील श्री. रामदास कदरे यांनी आपल्या कुटुंबासाठी अत्यंत संघर्षमय जीवन जगले. सुरुवातीच्या काळात त्यांनी ऊसतोड मजूर म्हणून काम केले. ऊसतोडीचे काम म्हणजे कष्ट, अनिश्चितता आणि प्रतिकूल परिस्थितीशी रोजचा सामना. अशा परिस्थितीतही त्यांनी कुटुंबाच्या भवितव्यासाठी मेहनत केली. परिस्थिती बदलण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू ठेवले आणि पुढे एस.टी. महामंडळात चालक म्हणून सेवा बजावली. एका कष्टकरी कुटुंबाने आपल्या पुढच्या पिढीला शिक्षणाच्या माध्यमातून चांगले भविष्य मिळावे, यासाठी केलेला हा संघर्ष आज श्री. देवदत्त कदरे यांच्या यशातून सार्थकी लागल्याची भावना व्यक्त होत आहे.

श्री. रामदास कदरे यांनी स्वतःच्या आयुष्यात अनेक अडचणींचा सामना केला असला तरी मुलाच्या शिक्षणाला आणि त्याच्या ध्येयाला त्यांनी प्रोत्साहन दिले. आर्थिक परिस्थिती मर्यादित असताना मुलाने मोठे स्वप्न पाहणे आणि त्या स्वप्नाच्या दिशेने वाटचाल करणे यासाठी कुटुंबाचा पाठिंबा अत्यंत महत्त्वाचा असतो. श्री. देवदत्त कदरे यांच्या बाबतीत हा पाठिंबा त्यांना मिळाला. वडिलांनी कष्टाचे जीवन जगले, त्याग केला आणि मुलाच्या शिक्षणासाठी सकारात्मक वातावरण निर्माण केले. त्या संस्कारातून श्री. देवदत्त कदरे यांनी मेहनत, प्रामाणिकपणा आणि संघर्ष करण्याची वृत्ती आत्मसात केली. त्यामुळे त्यांचे यश हे केवळ त्यांचे व्यक्तिगत यश नसून, त्यांच्या कुटुंबाच्या दीर्घ संघर्षाचे फलित मानले जात आहे.

कदरे कुटुंबाची ही वाटचाल ग्रामीण महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांच्या जीवनाशी साधर्म्य सांगणारी आहे. ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातील पालक आपल्या मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी स्वतःच्या सुखसोयींचा त्याग करतात. मुलांनी चांगले शिक्षण घ्यावे, स्वतःच्या पायावर उभे राहावे आणि कुटुंबाचे नाव उज्ज्वल करावे, ही त्यांची अपेक्षा असते. श्री. देवदत्त कदरे यांनी आपल्या वडिलांच्या या अपेक्षेला कर्तृत्वाची जोड देत ती पूर्ण केली आहे. त्यामुळे त्यांच्या यशामध्ये आई-वडिलांचे संस्कार, कुटुंबीयांचा पाठिंबा आणि त्यांच्या स्वतःच्या संघर्षाची सांगड दिसून येते.

नागतळा गावासाठीही श्री. देवदत्त कदरे यांची निवड ही अभिमानाची बाब आहे. गावातील एका युवकाने राज्य उत्पादन शुल्क विभागात उपनिरीक्षक पदापर्यंत मजल मारणे ही बाब गावातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारी आहे. विशेष म्हणजे या पदावर निवड होणारे नागतळा गावातील ते पहिले व्यक्ती ठरल्याने त्यांच्या यशाला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यांच्या यशामुळे गावातील तरुणांमध्ये स्पर्धा परीक्षांविषयी सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे. ग्रामीण भागातही गुणवत्तेची कमतरता नाही; आवश्यकता आहे ती योग्य दिशेने प्रयत्न करण्याची आणि दीर्घकाळ सातत्य राखण्याची, हे त्यांच्या यशातून स्पष्ट झाले आहे.

आजच्या काळात स्पर्धा परीक्षांमध्ये मोठी स्पर्धा आहे. हजारो विद्यार्थी विविध शासकीय पदांसाठी प्रयत्न करतात. अशा वेळी अनेकांना सुरुवातीच्या अपयशामुळे निराशा येते. काही जण परिस्थिती, आर्थिक अडचणी, मार्गदर्शनाचा अभाव किंवा वेळेची कमतरता यांना कारण मानून प्रयत्न सोडतात. मात्र श्री. देवदत्त कदरे यांच्या प्रवासातून परिस्थितीला दोष देण्याऐवजी परिस्थितीवर मात करण्याची प्रेरणा मिळते. त्यांनी सात वर्षे स्पर्धा परीक्षेचा अभ्यास केला, त्यानंतर शासकीय सेवेत कॉन्स्टेबल म्हणून कार्यरत असतानाही अभ्यास सुरू ठेवला आणि अखेर उपनिरीक्षकपद मिळविले. त्यामुळे त्यांच्या यशाचा प्रवास विशेषतः संघर्ष करणाऱ्या युवकांसाठी दिशादर्शक ठरणारा आहे.

श्री. देवदत्त कदरे यांच्या यशाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी शासकीय सेवेत प्रवेश मिळाल्यानंतरही स्वतःच्या प्रगतीची वाटचाल थांबविली नाही. कॉन्स्टेबल पदावर कार्यरत असताना त्यांनी पुढील संधीचा शोध घेतला आणि त्यासाठी आवश्यक असलेली मेहनत केली. आपल्या पदाचा आदर राखत कर्तव्य पार पाडणे आणि त्याच वेळी स्वतःच्या क्षमतेचा अधिक चांगला उपयोग करण्यासाठी प्रयत्न करणे, ही वृत्ती त्यांच्या यशातून दिसून येते. त्यामुळे त्यांची निवड ही केवळ पदोन्नतीसारखी बाब नसून, स्वतःसाठी निश्चित केलेले ध्येय पूर्ण करण्याच्या त्यांच्या इच्छाशक्तीचे उदाहरण आहे.

या उल्लेखनीय यशानिमित्त रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ९ वाजता नागतळा येथे श्री. देवदत्त रामदास कदरे यांच्या सन्मानार्थ भव्य मिरवणूक आणि सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम नागनाथ देवस्थान मंदिर, नागतळा, ता. आष्टी, जि. बीड येथे होणार आहे. आपल्या गावातील सुपुत्राने मिळविलेल्या यशाचा गौरव करण्यासाठी ग्रामस्थ आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी भंडारा व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या सत्कार सोहळ्यास धार्मिक क्षेत्रातील मान्यवरांचे आशीर्वादही लाभणार आहेत. यामध्ये ह.भ.प. काशिनाथ महाराज (गणेशगड संस्थान व नागनाथ देवस्थान, नागतळा), ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री (तारकेश्वर गड), ह.भ.प. विष्णू महाराज आंधळे (रामगड संस्थान, लिंबोडी), ह.भ.प. रामकृष्ण महाराज (विठ्ठल गड, पांगरा) तसेच ह.भ.प. देविदास महाराज गर्जे (खिळद) यांचे आशीर्वाद लाभणार आहेत. त्यामुळे देवदत्त कदरे यांच्या यशाचा गौरव करणारा हा सोहळा ग्रामस्थांसाठी विशेष महत्त्वाचा ठरणार आहे.

श्री. देवदत्त कदरे यांच्या यशाने कडा येथील श्रीराम उच्च माध्यमिक विद्यालयाचे नावही उज्ज्वल झाले आहे. सन २००४ चे माजी विद्यार्थी म्हणून त्यांनी मिळविलेले यश हे त्यांच्या शैक्षणिक संस्थेसाठीही अभिमानाची बाब आहे. ज्या शाळेतून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला दिशा मिळाली, त्याच संस्थेच्या माजी विद्यार्थ्याने आज राज्य उत्पादन शुल्क विभागात उपनिरीक्षक पद मिळविल्याने शिक्षक, माजी विद्यार्थी आणि परिसरातील शिक्षणप्रेमींमध्येही आनंद व्यक्त केला जात आहे.

त्यांच्या यशातून ग्रामीण भागातील पालकांसाठीही महत्त्वाचा संदेश मिळतो. मुलांच्या शिक्षणासाठी परिस्थिती कितीही कठीण असली तरी त्यांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवणे आणि त्यांना ध्येय निश्चित करण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे. श्री. रामदास कदरे यांनी स्वतः कष्टाचे जीवन जगूनही मुलाच्या शिक्षणाला आणि भविष्यातील ध्येयाला प्रोत्साहन दिले. त्या पाठबळाला श्री. देवदत्त कदरे यांनी आपल्या मेहनतीची जोड दिली आणि आज त्याचे फलित संपूर्ण गावासमोर आहे.

नागतळ्याच्या मातीतून सुरू झालेला शैक्षणिक प्रवास, कडा येथे झालेले उच्च माध्यमिक शिक्षण, पुण्यातील सुमारे सात वर्षांचा स्पर्धा परीक्षेचा अभ्यास, राज्य उत्पादन शुल्क विभागात कॉन्स्टेबल म्हणून केलेली सेवा, नोकरीसोबत सुरू ठेवलेली अभ्यासाची धडपड आणि अखेर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या राज्य उत्पादन शुल्क विभागीय परीक्षा-२०२५ मधून मिळविलेले उपनिरीक्षकपद, अशी श्री. देवदत्त रामदास कदरे यांची ही वाटचाल अनेक वळणांनी भरलेली आहे. या प्रत्येक टप्प्यावर त्यांनी एक गोष्ट कायम ठेवली ती म्हणजे ध्येयावरचा विश्वास. त्यांच्या यशामागे केवळ एका दिवसाची किंवा एका परीक्षेची मेहनत नाही, तर अनेक वर्षांच्या संयमाची, त्यागाची आणि सातत्याची शिदोरी आहे. त्यामुळे त्यांचे यश ग्रामीण युवकांना विशेष प्रेरणा देणारे आहे. आजच्या स्पर्धेच्या युगात मोठ्या शहरांमध्ये जाऊनच यश मिळते असे नाही; आपल्या परिस्थितीतून मार्ग काढत, आवश्यक त्या संधींचा उपयोग करत आणि सातत्यपूर्ण मेहनत करत राहिल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही राज्यस्तरीय स्पर्धेत यश मिळवू शकतात, हे त्यांनी सिद्ध केले आहे.

ऊसतोड मजूर म्हणून कष्ट केलेल्या वडिलांचा मुलगा आज राज्य उत्पादन शुल्क विभागात उपनिरीक्षक झाला आहे, ही बाब कदरे कुटुंबाच्या संघर्षाची आणि शिक्षणाच्या सामर्थ्याची जिवंत साक्ष ठरली आहे. वडिलांनी केलेल्या कष्टांचे चीज करत श्री. देवदत्त कदरे यांनी कुटुंबाचा मान उंचावला असून, नागतळ्याच्या शिरपेचातही मानाचा तुरा रोवला आहे. त्यांच्या यशामुळे गावातील अनेक विद्यार्थ्यांच्या डोळ्यांसमोर आता शासकीय सेवेत जाण्याचे नवे स्वप्न उभे राहणार आहे.

परिस्थिती बदलण्याची वाट पाहत बसण्यापेक्षा स्वतःच्या मेहनतीने परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे, हे श्री. देवदत्त कदरे यांच्या यशातून अधोरेखित होते. अपयश आले तरी प्रयत्न सोडायचे नाहीत, नोकरी मिळाली तरी ध्येय थांबवायचे नाही, जबाबदाऱ्या वाढल्या तरी अभ्यासाची साखळी तुटू द्यायची नाही आणि कुटुंबाच्या कष्टांची जाणीव ठेवून स्वतःच्या भविष्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करायचे, या मूल्यांवर उभी असलेली त्यांची यशोगाथा निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांच्या या उल्लेखनीय निवडीबद्दल नागतळा, कडा, आष्टी आणि परिसरातील ग्रामस्थ, विद्यार्थी, पालक, शिक्षक, मित्रपरिवार तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून श्री. देवदत्त रामदास कदरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागातील उपनिरीक्षक म्हणून त्यांच्या पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा व्यक्त होत असून, त्यांच्या कर्तृत्वाची ही भरारी ग्रामीण भागातील अनेक युवकांना स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून आपल्या आयुष्याला नवी दिशा देण्यासाठी निश्चितच प्रेरणा देईल. नागतळ्याच्या एका सामान्य कुटुंबातून सुरू झालेला हा संघर्षाचा प्रवास आज शासकीय सेवेत उपनिरीक्षक पदापर्यंत पोहोचला असून, 'जिद्द असेल तर परिस्थितीवरही विजय मिळविता येतो' याचे श्री. देवदत्त कदरे हे जिवंत उदाहरण ठरले आहेत.

शब्दांकन...
राजेंद्र लाड,आष्टी
(९४२३१७०८८५)

# राजर्षी शाहू कन्या विद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिना निमित्त मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त गुणवंत खेळाडूंचा सन्मान

## राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्राप्त आदर्श मुख्यध्यापिका कविता गित्ते (कराड) यांचा निवासी उपजिल्हाधिकारी मा. शिवकुमार स्वामी व पोलीस उप अधीक्षक राजीव नवले यांच्या हस्ते गौरव

बीड प्रतिनिधी

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड आणि श्री. छत्रपती राजर्षी शाहू महाराज प्रबोधन मंडळ, बीड संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय आणि राजमाता इंग्लिश स्कूल, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हॉकीचे महान खेळाडू व हॉकीचे जादूगर मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमास क्रीडा क्षेत्रातील गुणवंत खेळाडूंचा, राष्ट्रीय आदर्श शिक्षीकेचा व महिला हॉकी खेळाडूचा गौरव निवासी उपजिल्हाधिकारी मा. शिवकुमार स्वामी व पोलीस उप अधीक्षक मा. राजीव नवले यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमास जिल्हा क्रीडा अधिकारी मा. अरविंद विद्यागर, संस्थेचे अध्यक्ष इंजि. बलभिमराव जाहेर पाटील, संस्था सचिव प्रा. जे. पी. शेळके, जेष्ठ क्रीडा संघटक प्रा. दिनकर थोरात, राज्य तायक्वाँदोचे संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, श्री विनायक वझे, संस्था संचालक प्रा. शिवाजीराव जगताप, प्राचार्य अनंतराव डंबरे, संस्था संचालक मा. विनोद डोंगरे, सुर्योदयचे कार्यकारी संपादक श्री. दिपक काळकुटे, तालुका क्रीडा अधिकारी श्री सुरेंद्र कराड, क्रीडा अधिकारी श्री अनिकेत काळे, श्री कालिदास होसुरकर, क्रीडा मार्गदर्शक श्री रेवननाथ शेलार, श्री सतिष राठोड, श्री अविनाश पाटील, क्रीडा संयोजक श्री जितेंद्र आराक, श्रीमती एस.डी. कदम, श्री. आर.टी. राऊत, प्राचार्य आर.डी. लोखंडे यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



यावेळी सन २०२६ चा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल साने गुरूजी निवासी शाळा, केजच्या आदर्श मुख्यध्यापिका श्रीमती कविता गित्ते (कराड) यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून विशेष सत्कार करण्यात आला. तसेच हॉकीच्या राष्ट्रीय खेळाडू श्रीमती क्षितीजा गव्हाणे यांचाही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देवून विशेष सत्कार करण्यात आला. बीड जिल्हयातील राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी झालेल्या व अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत सहभाग घेवून प्राविण्य मिळविलेल्या गुणवंत खेळाडूंचा सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड अंतर्गत मैदानी, सॉफ्टबॉल व बेसबॉल जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर नियमित सराव करणाऱ्या खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी क्रीडा साहित्याचे (किट) वितरण प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मार्गदर्शक करताना निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शिवकुमार स्वामी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी केवळ मेडल मिळविण्यासाठी नव्हे तर उत्तम शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी खेळाकडे पाहिले पाहिजे. खेळामुळे शिस्त, आत्मविश्वास, चिकाटी आणि नेतृत्वगुण विकसित होतात. खेळामुळे मानसाला जिवनात यश, अपयश सहज पचवता येते. त्यामुळे प्रत्येकाने खेळाचे महत्त्व लक्षात घेतले पाहिजे.

पोलीस उप अधीक्षक श्री. राजीव नवले यांनी खेळाडूंनी मेजर ध्यानचंद यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन राष्ट्रप्रेम मनात ठेवून खेळावे असे आवाहन केले.सन २०२६ या वर्षाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहिर झालेल्या साने गुरूजी निवासी शाळा, केजच्या आदर्श मुख्यध्यापिका श्रीमती कविता गित्ते (कराड) यांनी त्यांच्या मनोगतामध्ये त्यांना जाहिर झालेल्या सन २०२६ चा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारामध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी व त्यांच्या कार्यालयाचे खूप मोठे योगदान आहे असे प्रतिपादन केले.संस्था सचिव प्रा. जे. पी. शेळके यांनी खेळाडूंना शुभेच्छा देतांना, मेजर ध्यानचंद यांच्या प्रमाणे आपल्या खेळातून ऑलिम्पिक पदके पटकावत देशाचा आणि बीड जिल्हयाचा नावलौकिक वाढवावा असे आवाहन केले.कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपन सुर्योदयचे कार्यकारी संपादक श्री. दिपक काळकुटे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन श्री. ज्ञानेश्वर कोटुळे यांनी केले तर आभार श्री. एस.सी. जगताप यांनी मानले.



# गेवराईत 'अमृत दौड' उत्साहात संपन्न तरुणांचा जल्लोष!

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मिनी मॅरेथॉनला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

गेवराई, दि. २९ प्रतिनिधी -:

राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून गेवराई नगर परिषद व श्री चिंतेश्वर विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेली 'अमृत दौड' तालुकास्तरीय मिनी मॅरेथॉन स्पर्धा शनिवारी मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाली. सकाळच्या प्रसन्न वातावरणात धावपटूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शहरातून धावत फिटनेस, आरोग्य आणि क्रीडा संस्कृतीचा संदेश दिला.

भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, अंबाजोगाईच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. गेवराई नगर परिषद प्रांगणातून मान्यवरांच्या उपस्थितीत मिनी मॅरेथॉनला सुरुवात करण्यात आली. युवक, विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतल्याने संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

या कार्यक्रमासाठी लोकनेते गेवराई भाजपाचे मा. श्री. बाळराजे दादा पवार, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह मा. श्री. डॉ. हेमंतजी वैद्य,युद्धजीत पंडीत, यशराज पंडीत, शिवराज पवार,यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी नगरपरिषद चे गटनेते तथा सभापती मा. श्री.ऍड राजेंद्र राक्षसभुवनकर, श्री चिंतेश्वर विद्यालयाचे उपाध्यक्ष मा. श्री. डॉ. राधेश्याम झंवर, कार्यवाह मा. श्री. दत्तात्रय पत्की, भगवानराव घुम्बार्डे आदी मान्यवर उपस्थित होते.

धावले गेवराईकर... दिला निरोगी जीवनाचा संदेश!

'अमृत दौड'मध्ये सहभागी झालेल्या युवक व विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळाला. नियमित व्यायाम, शारीरिक तंदुरुस्ती आणि निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करा, असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. धावपटूंच्या उत्साहामुळे शहरातील वातावरणही क्रीडामय झाले होते.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष श्री. अक्षय कुलकर्णी,यांच्यासह नगर परिषद व श्री चिंतेश्वर विद्यालय परिवाराने विशेष परिश्रम घेतले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# राळेसांगवीत हरिनामाच्या गजराने दुमदुमला परिसर

## संत ज्ञानेश्वर महाराज व संत भगवान बाबा जन्मोत्सवानिमित्त ३५ वा अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात सुरू

मानूर प्रतिनिधी ह्व

शिरूर कासार तालुक्यातील राळेसांगवी येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराज व संत भगवान बाबा जन्मोत्सवानिमित्त तसेच श्रावण महिन्याचे औचित्य साधून ३५ व्या वर्षी अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचा शनिवारी (ता.२९) उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. संत वामनभाऊ महाराज, संत भगवान बाबा व संत निगमानंद महाराज यांच्या नामघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

संत वामनभाऊ महाराज, संत भगवान बाबा व निगमानंद महाराज यांच्या आशीर्वादाने, विठ्ठल महाराज गहिनीनाथ गडकर व न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री भगवानगडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. महंत स्वामी जनार्दन महाराज मच्छिंद्रगडकर यांच्या शुभहस्ते सप्ताहाचा प्रारंभ झाला. यावेळी संजय देव राजहंस यांच्या मंत्रघोषात सप्ताहाची विधिवत सुरुवात करण्यात आली.

सप्ताहाच्या प्रारंभप्रसंगी गायनाचार्य महादेव महाराज घुंगरड, नाशिकेत महाराज जरे, इंद्रभान महाराज खेडकर, नारायण महाराज खेडकर, लक्ष्मण महाराज खेडकर, मृदंगाचार्य लहू महाराज देवकर, रमेश थिटे, पत्रकार चंद्रकांत राजहंस यांच्यासह राळेसांगवी व परिसरातील विविध भजनी मंडळांचे सदस्य, महिला, भाविक भक्त आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा गजर आणि संतांच्या जयघोषामुळे संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले होते.

सप्ताहादरम्यान दररोज काकडा भजन, विष्णुसहस्रनाम, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, भावार्थ रामायण, प्रवचन, कीर्तन आदी विविध धार्मिक कार्यक्रमांचे




आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहात गहिनीनाथ महाराज खेडकर सर, अशोक महाराज खेडकर सर, सुरेश महाराज थिटे (नांदेवाली), दत्तात्रय महाराज खेडकर सर, इंद्रभान महाराज खेडकर गुरुजी, लक्ष्मण महाराज खेडकर (राळेसांगवी) व डॉ. विश्वनाथ खेडकर सर यांची प्रवचने होणार आहेत.

तसेच महंत जनार्दन महाराज मच्छिंद्रगडकर, लक्ष्मण महाराज फड, रामेश्वर महाराज शास्त्री, नवनाथ महाराज शास्त्री, अतुल महाराज शास्त्री, चैतन्य महाराज शास्त्री व राम महाराज शास्त्री यांच्या कीर्तनाचा लाभ भाविकांना मिळणार आहे. शनिवार (ता.५ सप्टेंबर) रोजी महंत न्यायाचार्य डॉ. नामदेव महाराज शास्त्री भगवानगडकर यांचे काल्याचे कीर्तन होणार असून, त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

सप्ताहाच्या निमित्ताने नामवंत कीर्तनकार, प्रवचनकार, गायनाचार्य, मृदंग व तबलावादक तसेच गुणवंत-ज्ञानवंत मंडळींची उपस्थिती राहणार आहे. सप्ताहाचे सूत्रसंचालन सुभाष तात्या खेडकर करत आहेत. ग्रामस्थ व सप्ताह आयोजक मंडळाच्या वतीने धार्मिक सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात आली असून, सप्ताहामुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, संतवाङ्मय, अध्यात्म आणि भक्तीचा संदेश देणाऱ्या या धार्मिक सोहळ्याचा परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन राळेसांगवी ग्रामस्थ व सप्ताह आयोजक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.



## शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी नवे तंत्रज्ञान आणि संशोधनाचा उपयोग आवश्यक

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

उत्पादनखर्च कमी करून उत्पादकता वाढविण्यात कृषी महाविद्यालयांची महत्वाची भूमिका

नाशिक प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले आहे. मात्र शेतकऱ्याला कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्यासाठी नव्या तंत्रज्ञानावर आधारित व्यवस्था उभी करावी लागेल. त्यासाठी कृषी क्षेत्रातील आव्हाने लक्षात घेऊन आधुनिकीकरण, नवे तंत्रज्ञान आणि संशोधनाचा वापर करून उत्पादनखर्च कमी करीत उत्पादकता वाढविण्यासाठी कृषी महाविद्यालयांनी महत्त्वाची भूमिका बजवावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या दिंडोरी तालुक्यातील मौजे चाचडगाव येथील कर्मयोगी दुलाजी सिताराम पाटील कृषी महाविद्यालयाच्या नूतन इमारतीच्या उद्धाटन प्रसंगी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी जलसंपदामंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री नरहरी झिरवाळ, खासदार डॉ. शोभा बच्छाव, राजाभाऊ वाजे, भास्कर भगरे, नाशिक महानगरपालिकेच्या महापौर हिमगौरी आहेर-आडके आदी उपस्थित होते.



## भारतीय शिक्षण संस्थेच्या वतीने अमृत दौड मॅरेथॉन सम्पन्न-अंबाजोगाई

अंबाजोगाई- प्रतिनिधी :

दि २९ ऑगस्ट रोजी भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या वतीने अंबाजोगाई शहरात 'अमृत दौड मॅरेथॉन' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राष्ट्रसंत भगवान बाबा चौक या मार्गावर ही मॅरेथॉन स्पर्धा उत्साहात पार पडली.ही स्पर्धा एकूण चार वेगवेगळ्या गटांत घेण्यात आली. अंबाजोगाई शहरासह परिसरातील विविध अकॅडमींचे युवक-युवती तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी झाले.

स्पर्धेच्या समारोपानंतर राष्ट्रसंत भगवान बाबा चौक येथे बक्षीस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी विजेत्या स्पर्धकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.कार्यक्रमाला उद्धाटक म्हणून अंबानगरीचे नगराध्यक्ष नंदकिशोरजी मुंदडा काकाजी, युवा नेते अक्षय भैया मुंदडा, भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे डॉ. आलूलकर, डॉ. कल्पना चाचौसाळकर, रामभाऊ कुलकर्णी, डॉ. अतुल देशपांडे, अविनाश मुडेगावकर यांच्यासह शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.या मॅरेथॉनच्या माध्यमातून युवकांमध्ये क्रीडाप्रेम, व्यायामाची आवड आणि निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला. स्पर्धेला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे अंबाजोगाई शहरातील क्रीडा क्षेत्राला नवी ऊर्जा मिळाल्याचे

## पत्रकार बांधवांना राखी बांधून चिंतेश्वर विद्यालयाने जपला स्नेहबंध!

### विद्यार्थिनी व शिक्षिकांचा अनोखा उपक्रम; पत्रकारांच्या सामाजिक योगदानाचा केला सन्मान

गेवराई प्रतिनिधी -:

रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त गेवराई शहरातील चिंतेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थिनी व शिक्षिकांनी अनोखा उपक्रम राबवत शहरातील पत्रकार बांधवांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे केले.

समाजातील विविध प्रश्न, समस्या आणि जनतेच्या भावना



आपल्या लेखणीच्या माध्यमातून प्रशासन व शासनापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार बांधव करीत असतात. त्यांच्या या सामाजिक योगदानाचा सन्मान करण्याच्या उद्देशाने चिंतेश्वर विद्यालयाच्या विद्यार्थिनी व शिक्षिकांनी पत्रकार बांधवांची भेट घेत त्यांच्या हातावर राखी बांधली.यावेळी विद्यार्थिनींनी पत्रकार बांधवांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देत सामाजिक बांधिलकीचा संदेश दिला. या अनोख्या उपक्रमामुळे पत्रकार बांधव आणि विद्यार्थिनी यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ झाला.

चिंतेश्वर विद्यालयाने राबविलेल्या या स्तुत्य व सामाजिक उपक्रमाचे पत्रकार बांधवांकडून कौतुक करण्यात आले. रक्षाबंधनाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांमध्ये प्रेम, आपुलकी आणि परस्पर सन्मानाची भावना निर्माण करण्याचा सुंदर संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

## माजलगाव मध्ये भा. शि. प्र संस्थेच्या वतीने 'अमृत दौड 'चे आयोजन

### उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक अनंत्रे करणार उद्घाटन

माजलगाव, प्रतिनिधी: भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचा अमृत महोत्सव व श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाचा हिरक महोत्सव तसेच राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाच्या क्रीडा उपक्रम समितीच्या वतीने माजलगावकरांसाठी 'अमृतदौड'या मिनी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. खेळाडू ,विद्यार्थी तसेच नागरिकांमध्ये आरोग्य जागृती,राष्ट्र प्रेम व शिस्त अंगी यावी या दृष्टीने या मिनी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेचे उद्घाटक व प्रमुख पाहुणे माजलगावचे कर्तव्यदक्ष उपविभागीय पोलीस अधिकारी अशोक अनंत्रे हे असणार आहेत. शनिवार दिनांक २९ ऑगस्ट रोजी सकाळी साडे सहा वाजता ही स्पर्धा मौलाना आझाद चौक येथून सुरुवात होऊन - बायपास रोड मार्गे संभाजी महाराज चौक (३ किमी )ह्या मार्गाने असणार आहे.

या स्पर्धेमध्ये १८ वर्षावरील खेळाडू , विद्यार्थी तसेच स्त्री-पुरुष नागरीक यांनी सहभागी व्हावे. विजेत्यांना आकर्षक बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी भा.शि प्र.संस्थेचे मान्यवर पदाधिकारी सभासद शिक्षक विद्यार्थी पालक यांचाही सहभाग असणार आहेत.

भा शि प्र.संस्थेने अमृत महोत्सव निमित्त व सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाच्या हीरक महोत्सवाचे औचित्य साधून तालुक्यातील विद्यार्थ्यांचा शारीरिक मानसिक बौद्धिक विकास व्हावा या भूमिकेतून 'अमृत दौड 'आयोजन केले आहे.या मिनी मॅरेथॉन मध्ये नागरिक, विद्यार्थी, पालक, महिला भगिनी यांनी अधिकाधिक संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भा शि प्र संस्थेच्या संयोजन समितीद्वारे तसेच श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुलाच्या स्थानिक व्यवस्था मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## लिंबागणेश येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवानिमित्त संगीतमय भागवतकथा सप्ताहास प्रारंभ

पोहीचा देव संस्थानचे महंत रंगनाथभाऊ वायंदेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण; पंचक्रोशीतील महानुभाव भाविकांची उपस्थिती

लिंबागणेश : (दि.२९) बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी सार्वजनिक महोत्सवानिमित्त आयोजित संगीतमय श्रीमद् भागवत कथा सप्ताहाच्या (दशम स्कंध) सोहळ्यास आज शनिवार, दि. २९ रोजी उत्साहात प्रारंभ झाला. पोहीचा देव संस्थानचे महंत रंगनाथभाऊ वायंदेकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

धार्मिक विधीनुसार श्रीदत्तात्रेय व लक्ष्मीनारायणाची पूजा करण्यात आली. यावेळी चौरंगावर पांढरे वस्त्र अंथरून त्यावर दत्तात्रेय महाराजांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. धूप, दीप,



फुले व नैवेद्य अर्पण करून आरती करण्यात आली.सप्ताहभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी पारायण, दुपारी उटी-उपहार, सायंकाळी आरती व प्रवचन, तर रात्री संगीतमय भागवतकथेचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीक्षेत्र पांचाळेश्वर, ता. गेवराई, जि. बीड येथील भागवताचार्य प.पू. महंत श्री ओंकार व्यास बाबा शास्त्री महानुभव यांचे प्रवचन या सप्ताहात होणार आहे. दि.५ सप्टेंबर रोजी काल्याच्या किर्तनाने भागवतकथा सप्ताहाची सांगता होणार आहे.

या धार्मिक सोहळ्यास पोहीचा देव संस्थानचे महंत रंगनाथभाऊ वायंदेकर, महंत विश्वनाथ बाबा यांच्यासह पंचक्रोशीतील महानुभाव भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.धार्मिक सोहळ्याच्या आयोजनासाठी मंदिराचे पुजारी विजय पाटोदेकर, राजेभाऊ आप्पा गिरे, अनंतकाका मुळे, बालासाहेब जाधव, कल्याण बापू वाणी, सुंदरनाना जाधव, बाळुकाका थोरात,बाळकृष्ण मुळे, विक्रांत वाणी, गणपत तागड, भगवान मोरे,गोवर्धन गिरे, रंजित भोसले, रामकिसन गिरे, विनायक वाणी, शंकर वाणी, दादा गायकवाड, संजय घोलप,लहु जाधव,संदीप मुळे, छबु मांगलकर, रामदास मुळे, अर्जुन घोलप, गणेश लिंबेकर, संतोष भोसले, सुदाम रणखांब, जय गिरे, भालचंद्र गिरे , तुळशीराम वनवे, विठ्ठल कदम, दशरथ दाभाडे, अर्जुन गिरे आदींनी उपस्थिती होती.

## स्वातंत्र्य सेनानी रामराव आवारगावकर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. शेख अनिसूर रहमान यांची नियुक्ती

बीड प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या बीड येथील नामांकित स्वातंत्र्य सेनानी रामराव आवारगावकर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी डॉ. शेख अनिसूर रहमान यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल शिक्षण, विधी व सामाजिक क्षेत्रातून मोठे स्वागत होत आहे.

डॉ. शेख अनिसूर रहमान यांनी याच महाविद्यालयात सहयोगी प्राध्यापक म्हणून सुमारे १७ वर्षे अखंड व निष्ठापूर्वक सेवा बजावली आहे. विधी शिक्षणातील प्रदीर्घ अध्यापनाचा अनुभव, उत्कृष्ट प्रशासकीय कौशल्य आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने राबविलेले विविध उपक्रम यांमुळे त्यांची प्राचार्यपदी झालेली निवड अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

त्यांच्या या निवडीबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा.आ. प्रकाशदादा सोळंके तसेच सरचिटणीस मा. आ.सतीशभाऊ चव्हाण व कोषाध्यक्ष किरणकुमार आवरगावकर यांनी त्यांचे विशेष सत्कार करून भावी वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व



सन्माननीय नियामक मंडळ सदस्यांनीही त्यांच्या नियुक्तीचे स्वागत केले आहे.

तसेच महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन मा.आ.राजेंद्र जगताप साहेब आणि महाविद्यालय विकास समितीच्या सर्व सदस्यांनी डॉ. शेख अनिसुर रहमान यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.आपल्या नियुक्तीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना डॉ. शेख अनिसूर रहमान यांनी सांगितले की, संस्थेच्या विश्वासास पात्र राहून महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा उंचावणे, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण विधी शिक्षण देणे आणि संस्थेची प्रतिष्ठा अधिक वृद्धिंगत करण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन कटिबद्ध राहीन.

डॉ. शेख अनिसूर रहमान यांच्या निवडीमुळे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी मिळून महाविद्यालयामध्ये प्राचार्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या यावेळी महाविद्यालय विकास समिती सदस्य तथा वरिष्ठ प्रा. अँड. के.एस. पंडित , प्रा. अँड एन.एन. साबळे, व सर्व कर्मचारी उपस्थित होते.आजी व माजी विद्यार्थी यांच्यासह बीड जिल्ह्यातील विधी क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## लोकनेते गोपीनाथ मुंडे वृद्धाश्रमात रक्षाबंधनाचा अनोखा सोहळा

वयोवृद्ध माता-माऊलींनी रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांना बांधल्या राख्या

बीड प्रतिनिधी

घाटसावळी येथील लोकनेते गोपीनाथ मुंडे वृद्धाश्रम व व्यसनमुक्ती केंद्रात रक्षाबंधनाचा स्नेहपूर्ण सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकार तथा रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांनी वृद्धाश्रमाला भेट दिली. यावेळी वयोवृद्ध माता-माऊलींनी त्यांना राख्या बांधून रक्षाबंधनाचा अनोखा सोहळा साजरा केला.

गोरक्षनाथ टेकडी येथे काल्याचे कीर्तन झाल्यानंतर संजय महाराज पाचपोर यांनी घाटसावळी येथील लोकनेते गोपीनाथ मुंडे वृद्धाश्रमाला भेट दिली. यावेळी त्यांनी वृद्धाश्रमातील वयोवृद्ध नागरिकांशी संवाद साधत त्यांची आपुलकीने विचारपूस केली. उपस्थित माता-माऊलींनी पाचपोर महाराजांना राखी बांधून स्नेहबंध दृढ केला.

यावेळी त्यांनी व्यसनमुक्ती केंद्रातील रुग्णांशीही संवाद साधला. व्यसनामुळे केवळ एका व्यक्तीचे नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाचे आणि अनेक पिढ्यांचे नुकसान होते. त्यामुळे व्यसनापासून दूर राहून नवीन जीवनाचा संकल्प करावा, असे आवाहन पाचपोर महाराजांनी केले.

पाचपोर महाराजांनी वृद्धाश्रमातील कामकाजाची पाहणी केली. समाजोपयोगी कार्य अत्यंत प्रामाणिकपणे राबविणाऱ्या संस्थेचे सर्वेसर्वा शिवाजीराव फड,संचालक चंद्रकांत फड व त्यांच्या कुटुंबीयांच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले. सामाजिक जाणीवेतून उभारण्यात आलेला स्वच्छ आणि सुंदर आश्रम पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. वयोवृद्धांची प्रामाणिकपणे सेवा केल्यास समाजकार्य करताना कोणतीही कमतरता भासत नाही, असेही ते यावेळी म्हणाले.

या प्रसंगी श्री ह. भ. प. प्रा. डॉ. नाना महाराज कदम, हरिदास (भाऊ) जोगदंड, श्री ह. भ. प. सुरेश महाराज जाधव, गणेश



महाराज बांडे, सोमनाथ माने, बंकटराव माने,कृ उ बा स संचालक नितीन फड,पांडुरंग महाराज शिंदे, माऊली दराडे आदी उपस्थित होते.

वयोवृद्ध माता-माऊलींनी संजय महाराज पाचपोर यांना राखी बांधल्याने वृद्धाश्रमात आपुलकी, प्रेम आणि कृतज्ञतेचा अनोखा सोहळा अनुभवायला मिळाला. या कार्यक्रमाचे नियोजन अजिनाथ शेरकर,गायकवाड, नेहरकर, योगेश कुलकर्णी, सहदेव फड,बाबू फड यांनी केले

# सुख-शांतीचा मार्ग सम्यक असावा,मार्ग चुकला की दुःख निश्चित ; केज मध्ये धम्मप्रवचनात ॲड. बी.बी.धन्वे यांचे मार्गदर्शन

केज/प्रतिनिधी

भारतीय बौद्ध महासभा,शहर शाखा केज यांच्या वतीने आयोजित वर्षावास निमित्त धम्मप्रवचन मालिका व ग्रंथवाचन - २०२६ अंतर्गत ३१ व्या दिवसाचा कार्यक्रम शुक्रवार दि.२८ ऑगस्ट रोजी अत्यंत भाविक आणि उत्साही वातावरणात पार पडला.श्रावण पौर्णिमा या विषयावर आधारित आयोजित या धम्म प्रवचन व ग्रंथवाचन सोहळ्याचे अध्यक्ष स्थान भारतीय बौद्ध महासभा केज शहराध्यक्ष आयु. जयपाल मस्के यांनी भूषवले.कार्यक्रमाच्या सुरुवातीस तथागत गौतम बुद्ध,सम्राट अशोक व बोधिसत्व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना वंदन करून त्रिशरण व पंचशील ग्रहण करण्यात आले.या कार्यक्रमास मुख्य मार्गदर्शक व प्रमुख प्रवचनकार म्हणून भारतीय बौद्ध महासभा बीड जिल्हा पूर्वचे जिल्हाध्यक्ष आयु.ड.बी.बी.धन्वे उपस्थित होते.त्यांनी भगवान बुद्धांच्या तत्त्वज्ञानातील पायाभूत मानल्या जाणाऱ्या 'त्रिलक्षण' (अनित्य,दुःख आणि अनात्म) या संकल्पनां सोबतच श्रावण पौर्णिमेचे धम्म इतिहासातील महत्त्व यावर सखोल व प्रभावी मार्गदर्शन केले.



आपल्या धम्मप्रवचनात बोलताना ड.बी.बी. धन्वे म्हणाले की, श्रावण पौर्णिमा ही असत्यावर सत्याचा आणि दुर्गुणावर गुणांच्या विजयाचे प्रतीक आहे.याच पावन दिवशी तथागत बुद्धांनी हिंसक अंगुलिमालाचे हृदय परिवर्तन करून त्याला धम्माचा मार्ग दाखवला होता.तसेच बौद्ध इतिहासामध्ये श्रावण पौर्णिमेला प्रथम धम्म संगीती आयोजित होऊन सुत्तपिटकाची निर्मिती करण्यात आली होती,जे धम्माच्या संरक्षणातील महत्त्वाचे पाऊल ठरले.अनित्य,अनात्म आणि दुःख या विषयावर स्पष्टीकरण देताना ते पुढे म्हणाले की, मानवाला आयुष्यात सुख,शांती आणि समाधान हवे असते ; परंतु ते मिळवण्याचा मार्ग 'सम्यक' (योग्य) असावा.मार्ग चुकला की जीवनात दुःख निर्माण होते. सृष्टीतील प्रत्येक गोष्ट परिवर्तनशील असून काहीही शाश्वत नाही,हेच 'अनित्य' सत्य आहे.या तात्पुरत्या गोष्टींना घट्ट पकडून ठेवण्याच्या मानवी प्रवृत्तीमुळे 'दुःख' निर्माण होते. माणसाने स्वतःतील मी पणा आणिअहंपणाचा त्याग करून 'अनात्म' भावाची जाणीव ठेवल्यास तो दुःखाच्या पाशातून मुक्त होऊन वास्तविक शांतता (निर्वाण) प्राप्त करू शकतो.अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना शहराध्यक्ष जयपाल मस्के म्हणाले की, वर्षावासाचा हा पावन काळ आत्मचिंतन आणि धम्मज्ञानाचा अंगीकार करण्याचा काळ आहे.धम्मग्रंथांचे नियमित वाचन,मनन आणि चिंतन केल्याने मानवी जीवनाला एक योग्य आणिसन्मार्गाची दिशा मिळते.बुद्धांचे विचार केवळ ऐकण्यासाठी नसून ते दैनंदिन आयुष्यात आचरणात आणणे आवश्यक आहे.केज शहरातील सर्वधम्मबंधू आणि भगिनींनी या धम्मप्रवचन मालिकेचा लाभ घेऊन समाजात शांतता,बंधुभाव आणि नीतिमत्ता जपण्या साठी कटिबद्ध राहावे.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन चंद्रकांत मस्के यांनी उत्कृष्टपणे केले. यासोहळ्यास भारतीय बौद्ध महासभेचे कल्याण मस्के,दीपक मस्के,साहेबराव हजारे, तसेच महिला शाखेच्या सरचिटणीस सुरेखा मस्के,कुसुम मस्के, रत्नमाला मस्के, कलावती हजारे, हौसाबाई हजारे, जनाबाई मस्के,पुष्पा मस्के,मैनाबाई मस्के, शीतल लोमटे,वर्षा हजारे,अंजली हजारे यांच्यासह केज शहरातील सर्व धम्मबंधू,भगिनी व उपासक-उपासिका, बालक-बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचा शेवट सरनत्त गाथेने झाला.

# दोन तृतीयांश पेन्शन प्रकरणी पुणे जिल्हाधिकाऱ्यांना मॅटचा दणका..!

## १० हजारांचा जामीनपात्र वॉरंट

मुंबई प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणासमोर सुरू असलेल्या श्री. कांताराम धोंडू ताटले यांच्या पेन्शन प्रकरणात प्रतिवादींकडून न्यायाधिकरणाच्या निर्देशांचे पालन न झाल्याने न्यायाधिकरणाने कडक भूमिका घेतली आहे. १९ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत प्रतिवादींकडून उत्तर दाखल करण्यात आले नसल्याचे तसेच प्रतिवादी अनुपस्थित राहिल्यामुळे न्यायाधिकरणाने प्रतिवादी पुणे जिल्हाधिकारी यांच्याविरुद्ध १० हजार रुपयांचा जामीनपात्र वॉरंट बजावण्याचे निर्देश दिले असून प्रकरणाची पुढील सुनावणी १५ सप्टेंबर २०२६ रोजी ठेवली आहे. याचिकाकर्ते यांच्या वतीने अँडव्होकेट भूषण बांदिवडेकर यांनी काम पाहिले. त्यांना

अँड. अरविंद बांदिवडेकर व अँड. भूषण बांदिवडेकर यांनी सहाय्य केले.

या प्रकरणात श्री. ताटले यांनी त्यांच्या सक्तीच्या सेवानिवृत्तीच्या आदेशाला आव्हान देत पुणे जिल्हाधिकारी व पुणे विभागीय आयुक्त यांना प्रतिवादी करत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणात याचिका दाखल केली आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ मधील नियम १०० अन्वये २/३ पेन्शन व ग्रॅच्युइटीचा लाभ मिळावा, यासाठी स्वतंत्र अर्ज करण्यात आला आहे. अर्जात १ ऑक्टोबर २०१५ पासून दोन तृतीयांश पेन्शन देण्याची तसेच दोन तृतीयांश ग्रॅच्युइटी अदा करण्याची मागणी करण्यात आली आहे.या मागणी संदर्भात ५ ऑगस्ट २०२६ रोजी झालेल्या सुनावणीत न्यायाधिकरणाने प्रतिवादींना तातडीने उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले होते. पुढील तारखेपर्यंत उत्तर प्राप्त न झाल्यास प्रतिवादी क्रमांक १ यांनी वैयक्तिकरित्या उपस्थित राहावे, असेही आदेशात नमूद करण्यात आले होते. मात्र, १९ ऑगस्टच्या सुनावणीवेळीही न्यायाधिकरणाच्या पूर्वीच्या निर्देशानुसार उत्तर दाखल झाले नसल्याचे आणि प्रतिवादी क्रमांक १ उपस्थित नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे न्यायाधिकरणाने १० हजार रुपयांचा जामीनपात्र वॉरंट काढण्याचे आदेश दिले. हा वॉरंट एका आठवड्यात परत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले असून प्रकरण १५ सप्टेंबर २०२६ रोजी पुढील सुनावणीसाठी ठेवण्यात आले आहे.

# वडवणी शहराचे लौकिक सलोख्याने जपू : आ.प्रकाशदादा सोळंके

## शांतता अन् सौहार्द कायम ठेवण्यासाठी शांतता कमिटीची बैठक संपन्न

वडवणी प्रतिनिधी-शहरात किरकोळ कारणावरून घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर वडवणी तहसिल कार्यालय येथे शांतता व सौहार्द कायम ठेवण्यासाठी आ. प्रकाश सोळंके यांनी पुढाकार घेत तहसील कार्यालयात शांतता कमिटीची बैठक घेतली. यावेळी त्यांनी वडवणी शहराचे लौकिक सलोख्याने जपू असे प्रतिपादन केले. तसेच सर्वांनी शांतता आणि संयम राखण्याचे आवाहन केले. काही दिवसांपूर्वी वडवणी शहरात निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहरातील शांतता व सामाजिक सलोखा पुन्हा दृढ व्हावा, यासाठी शांतता समितीची बैठक घेण्यात आली. घडलेली घटना ही वाहन पार्किंगच्या किरकोळ कारणातून घडली, मात्र त्याचे स्वरूप धार्मिक वादाच्या दिशेने गेले, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. भविष्यात अशा किरकोळ



घटनांना वेगळे स्वरूप प्राप्त होऊ नये, यासाठी प्रत्येक समाजातील अशा प्रवृत्तींनावेळीच आळा घालणे आवश्यक आहे. यावेळी पुढे बोलताना आ. प्रकाश सोळंके म्हणाले की, घडलेल्या घटनेची कायद्यानुसार चौकशी होऊन दोषींवर योग्य ती कठोर कारवाई झालीच पाहिजे, ही आमची स्पष्ट भूमिका आहे. पोलिसांनी तपासाची पूर्तता करून दोषींवर कायद्यानुसार कठोरातील कठोर कारवाई करावी, अशा सूचनाही यावेळी करण्यात आल्या. मात्र, या कारवाई सोबतच शहरातील सामाजिक सलोखा आणि शांततेला कोणत्याही परिस्थितीत तडा जाऊ नये, हीदेखील अपेक्षा व्यक्त केली. वडवणी शहरातील नागरिक आजवर गुण्यागोविंदाने आणि परस्पर सामंजस्याने राहत आले आहेत. हा सामाजिक सलोखा हीच वडवणीची खरी ओळख आणि लौकिक आहे. शहरातील वाद शहरातील नागरिकांनी परस्पर संवाद, संयम आणि सामंजस्यातून सोडविले तर कोणत्याही बाहेरील व्यक्तीला परिस्थितीचा गैरफायदा घेऊन वाद चिघळविण्याची संधी मिळणार नाही असे सांगितले आहे. यावेळी शहरातील प्रतिष्ठित नागरिक व सर्व जाती धर्माचे नागरिक उपस्थित होते.यावेळी नांगरिकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या यावेळी तहसिलदार वैभव मंहेद्रकर साहेब , एपीआय वर्षा व्होगाडे ,डिवाय एसपी अशोक अंनत्रे साहेब,नगरअध्यक्ष शेषेराव जगताप, जेष्ठ नेते राजेभाऊ मुंडे, नगरसेवक सुधीर भाऊ ढोले, नगरसेवक संभाजी शिंदे, माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ राव म्हेत्रे, नगरसेवक भिमराव उजगरे, नगरसेवक अस्लम कुरेशी, बाबरी शेट मुंडे,अमोल आंधळे, विनायक मुळे, व पत्रकार बांधव उपस्थित होते.

# राष्ट्रीय क्रीडा दिना निमित्त राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार संपन्न

केज/प्रतिनिधी

हॉकीचे महान खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या जयंती निमित्त दि.२९ ऑगस्ट रोजी बीड जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिना निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.या कार्यक्रमास निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, जिल्हा पोलीस उप अधीक्षक नवले,जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर,शिव छत्रपती पुरस्कारप्राप्त प्रा.शेळके,संस्था चालक जाहेर पाटील, बेसबॉल संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा.दिनकर थोरात डॉ.कविता गीते - कराड यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.



यावेळी निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि जिल्हा पोलीस उपअधीक्षक नवले यांच्या हस्ते आदित्य विद्यागर,शुभांगी घुले, प्रांजल चौरे,स्वाती चौरे,पंकजा चौरे, ज्ञानेश्वरी चौरे आणि अश्विनी चौरे या राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. खेळाडूंनी आपल्या क्रीडा कौशल्यातून बीड जिल्ह्याचे नाव राष्ट्रीय स्तरावर उज्ज्वल केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रमात क्रीडा क्षेत्राचे महत्त्व,नियमित व्यायाम,शिस्त, संघभावना,नेतृत्वगुण तसेच क्रीडेतून होणारा व्यक्तिमत्त्व विकास याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.राष्ट्रीय खेळाडूंच्या यशातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन क्रीडा क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करावी,असा संदेश यावेळी देण्यात आला.

राष्ट्रीय क्रीडा दिना निमित्त आयोजित या सत्कार सोहळ्यामुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळाले असून, विद्यार्थ्यांमध्ये ही क्रीडा क्षेत्राविषयी उत्साह आणि प्रेरणा निर्माण झाली.कार्यक्रमास क्रीडाप्रेमी,खेळाडू आणि क्रीडा क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीचा विनयभंग; गुन्हा दाखल

परळी / प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मैदवाडी सेवानगर तांडा परिसरात अल्पवयीन मुलीला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून घेऊन जात तिच्याशी गैरवर्तन केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एवढेच नव्हे, तर मुलगी आणि तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात एका तरुणाविरुद्ध पोस्को कायद्यासह भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परळी ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दि. २८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी सुमारे २.३० वाजता मैदवाडी सेवानगर तांडा परिसरात हा प्रकार घडला आहे. रवी रामा पवार रा. मैंदवाडी सेवा नगर तांडा येथील आरोपीने अल्पवयीन मुलीला कथितरीत्या बळजबरीने मोटारसायकलवर बसवून नेले. त्यानंतर तिच्याशी लज्जा निर्माण होईल असे गैरवर्तन केले. या घटनेनंतर आरोपीने संबंधित मुलगी तसेच तिच्या कुटुंबीयांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा क्रमांक ४१२/२०२६ दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहितेतील कलम १३७(२), ३५१(२), ७४ तसेच बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण अधिनियम, २०१२ (झजउडज) मधील ८, १२ व संबंधित कलमांनुसार पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. गुन्हा दाखल झाल्यानंतर प्रकरणाचा तपास वरिष्ठांच्या आदेशाने सहाय्यक पोलीस निरीक्षक पागोटे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मल्हारी शिवरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पागोटे हे करीत आहेत.

# वृक्षवल्ली - राखी फॉर नेचर': धोंडराई येथे वृक्षांना राखी बांधून अनोख्या पद्धतीने साजरा झाला रक्षाबंधन सोहळा

## वृक्षवल्ली टीमच्या अनोख्या पर्यावरण संवर्धनाची सर्वत्र चर्चा गौरव, विद्यार्थिनींना शालेय साहित्याचे वाटप

गेवराई (प्रतिनिधी) निसर्गाचे रक्षण आणि संवर्धन हाच खरा मानवकल्याणाचा मार्ग आहे, हा उदात्त संदेश देत धोंडराई येथील पावन हनुमान मंदिर परिसरात 'वृक्षवल्ली - राखी फॉर नेचर' या अभिनव व कौतुकास्पद कार्यक्रमाचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले होते. रक्षाबंधनाचे औचित्य साधून गावातील शालेय विद्यार्थिनींनी वृक्षांना राख्या बांधून निसर्गाप्रती आपली कृतज्ञता व्यक्त केली. तसेच परिसरात भरपूर पाऊस पडावा आणि जगाचा पोशिंदा असलेल्या बळीराजाला सुख-समृद्धी लाभावी, यासाठी निसर्गाकडे साकडे घातले.हा अनोखा सोहळा यशस्वी करण्यासाठी वृक्षवल्ली टीमचे सर्व सदस्य गेल्या आठ दिवसांपासून अहोरात्र परिश्रम घेत होते. या उपक्रमाच्या उत्कृष्ट नियोजनामध्ये राजेंद्र साखरे, अक्षय खरात, रामेश्वर खरात (तात्या), अतुल नरवाडे, अनिल मगर, दादासाहेब गावडे, गणेश वाघमोडे, वैभव कदम, नानासाहेब कडू, अनिल पाचे, अमोल निकम, सवन कडू, माऊली माने आणि चंद्रकांत साखरे यांनी मोलाचे योगदान देऊन कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.या सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमाला गावातील व परिसरातील अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. यामध्ये धोंडराईच्या सरपंच कु. शितलताई साखरे, अजीम शेठ इनामदार, बळीराम कऱ्हे, रमेश साखरे, अमोल इनामदार, बीड येथील सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब धोत्रे, पावन हनुमान मंदिर कमिटीचे पदाधिकारी, जिल्हा परिषद शाळा धोंडराईचे माजी विद्यार्थी आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. सर्वच स्तरांतून या उपक्रमाचे मोठे कौतुक झाले.याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना मार्गदर्शक तात्यासाहेब मेघारे सर आणि जगदीश जाधव सर यांचे विचार अत्यंत मोलाचे व पर्यावरण संवर्धनाची प्रेरणा देणारे ठरले. झाडे जगवणे ही काळाची गरज कशी आहे, हे त्यांनी आपल्या मनोगतातून पटवून दिले. संपूर्ण कार्यक्रमाचे अत्यंत प्रभावी आणि नेटके सूत्रसंचालन जगदीश भैय्या खरात यांनी केले. विद्यार्थिनींनी झाडांना राख्या बांधून घेतलेली पर्यावरणाच्या रक्षणाची शपथ या सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरली.

वृक्षवल्ली टीमच्या या सातत्यपूर्ण आणि प्रामाणिक पर्यावरण संवर्धनाच्या कार्याची दखल घेत 'निरंकारी मंडळा'चे विष्णू काकडे (महात्मे) यांनी कार्यक्रमाला विशेष उपस्थिती लावली. त्यांनी टीमच्या या देशोपयोगी कार्याचे जाहीर कौतुक केले व वृक्षवल्ली टीमला सन्मानपत्र देऊन गौरविले. याप्रसंगी वृक्षवल्ली टीमच्या वतीने विष्णू काकडे (महात्मे) यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. तसेच त्यांच्या या पाठिंब्यामुळे टीमला भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाल्याचे सदस्यांनी सांगितले.कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण बिंदू म्हणजे लहान वयातच मुलांवर निसर्गप्रेमाचे संस्कार करणे हा होता. या अभियानात परिसरातील असंख्य विद्यार्थिनींनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. त्यांनी झाडांना



राखी बांधून त्यांच्या रक्षणाची जणू शपथच घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी, या सर्व निसर्गप्रेमी विद्यार्थिनींचा उत्साह वाढवण्यासाठी वृक्षवल्ली टीमच्या वतीने त्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. या शैक्षणिक मदतीमुळे विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला.निसर्गाशी थेट नाते जोडणारा हा स्तुत्य उपक्रम संपूर्ण परिसरात प्रचंड कौतुकाचा आणि चर्चेचा विषय ठरला आहे. आजच्या आधुनिक युगात झाडांचे महत्त्व ओळखून राबवलेला हा पॅटर्न इतर संस्थांसाठीही आदर्शवत ठरेल, अशा भावना नागरिकांनी व्यक्त केल्या.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक नागरिक, शिक्षक, पालक आणि पर्यावरणप्रेमींनी मोलाचे योगदान दिले. वृक्षवल्ली टीमच्या वतीने अधिकृत पत्रकाद्वारे सांगण्यात आले की, आपण सर्वांनी केलेल्या मोलाच्या सहकार्याबद्दल आम्ही आपले खूप खूप आभारी आहोत. आपले हेच प्रेम आणि सहकार्य भविष्यातही असेच कायम राहो, हीच सदिच्छा. या उपक्रमाच्या यशस्वीतेमुळे परिसरातून वृक्षवल्ली टीमवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सिमेवरच्या जवानांना राख्या पाठवून केले अभिष्टचिंतन ! सालसिध्द बाबा संस्थानचा स्तुत्य उपक्रम !

मानूर प्रतिनिधी. ह्व

शिरूर कासार जवळच असलेल्या श्री सालसिध्द संस्थानचे महंत यांच्या संकल्पनेतून शुक्रवारी रक्षा बंधनाचे औचित्य साधून सिमेवर देश रक्षणाचे काम करत असलेल्या सैनिक जवानांना पोस्टाद्वारे राख्या पाठवून आपल्या जवानांचे अभिष्टचिंतन केले .



श्रावणातील पौर्णिमा राखी पौर्णिमेला आपल्या संस्कृतीत बहीन भावाच्या हातात राखी बांधून बहीण भावाचे नाते एका नाजुक धाग्याने बंदिस्त करत असतात ,एखाद्या बहिणीला स्वत:चा भाऊ नसला किंवा एखाद्या भावाला बहिण नसली तरी बहिण भावाची उणीव जाणवू नये म्हणून हे नाते ईतरासी जोडून उणीव भरून काढतात . अशा पवित्र नात्यात मात्र सिमेवर देश रक्षणाचे काम करत असलेल्या सैनिक जवानाचा विसर पडू नये ते आपले खरे रक्षणकर्ते असल्याची जाणीव ठेऊन संस्थानचे महंत हनुमान महाराज शास्त्री यांनी आवर्जुन ११०० राख्यांचा एक बॉक्स पोस्टाद्वारे सिमेवर पाठवून सैनिकाप्रती आदरभाव व्यक्त केला .

अध्यात्मिक कार्य करत असतांना सामाजिक बांधीलकी सुध्दा जतन केली पाहीजे याची जाणीव ठेऊन त्यांनी हा उपक्रम राबवला . सालसिध्द बाबाच्या साक्षीने एक राखी देवाला समर्पित करून राख्याचा बॉक्स सिमेवर रवाना केला , या उपक्रमाबद्दल हनुमान शास्त्रीचे सर्वत्र कौतुक होत आहे .

# पोलिस अधीक्षक साहेब इकडे लक्ष द्या ?

### परळी तालुक्यातील मलकापूर गावात वाळी मध्ये टाकण्याचा प्रकार सुरूच, परळी ग्रामीण पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह ?

परळी प्रतिनिधी

बीड जिल्हा पोलीस दलाने जमिनीचे, कौटुंबिक तसेच गावातील किरकोळ वाद गंभीर गुन्ह्यांत रूपांतरित होण्यापूर्वीच त्यावर तोडगा काढण्यासाठी विविध उपक्रम सुरू केले आहेत. मात्र, परळी वैजनाथ ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मलकापूर गावात गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या वादातून कथित सामाजिक बहिष्कार, वाळीत टाकणे, धमक्या आणि दैनंदिन जीवनावर निर्बंध घालण्याचे प्रकार सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. त्यामुळे बीड पोलिसांनी जाहीर केलेल्या उपक्रमांची अंमलबजावणी परळी ग्रामीण पोलिसांकडून प्रत्यक्षात कितपत होत आहे, असा सवाल उपस्थित होत आहे.

मलकापूर गावात काही कुटुंबांना कथितरित्या सामाजिकदृष्ट्या दूर ठेवण्याचा प्रकार सुरू असल्याचा आरोप आहे. संबंधित कुटुंबाचे नाव व्हॉट्सप ग्रुपवर टाकून 'आजपासून या परिवारावर बहिष्कार' अशा आशयाचे संदेश प्रसारित केले जात असल्याची तक्रार आहे. संबंधित कुटुंबाशी कोणी बोलू नये, त्यांना कोणत्याही कार्यक्रमाचे निमंत्रण देऊ नये, तसेच त्यांच्याशी संबंध ठेवणाऱ्यांशीही वैर घेतले जाईल, अशा स्वरूपाच्या धमक्या दिल्या जात असल्याचेही सांगितले जात आहे.गावातील वादाचा फटका काही कुटुंबांच्या सामाजिक जीवनाला बसत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. लग्नसमारंभ, धार्मिक कार्यक्रम, सण-उत्सव, अंत्यविधी यांसारख्या सामाजिक प्रसंगांपासून काही परिवारांना दूर ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याची तक्रार आहे. एखाद्या कुटुंबाला निमंत्रण दिल्यास संबंधित कार्यक्रमाला आम्ही येणार नाही,

# गप्पेवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

## श्रीमद् भागवत कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची भक्तिमय पर्वणी

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील गप्पेवाडी येथे समस्त गावकरी मंडळी व भजनी मंडळाच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह,श्रीमद् भागवत कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या धार्मिक सोहळ्यामुळे गप्पेवाडी परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे.शनिवार, दि.२९ ऑगस्ट २०२६ रोजी सप्ताहाचा प्रारंभ झाला असून शनिवार, दि.५ सप्टेंबर २०२६ रोजी सांगता होणार आहे.सप्ताहा दरम्यान विविध कीर्तनकार महाराजांचे कीर्तन, प्रवचन तसेच धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमात ह.भ.प. महारूद्र महाराज खाडे,ह.भ.प. आप्पासाहेब महाराज चौरे,ह.भ.प.महंत श्रीराम महाराज विडेकर,ह.भ.प. तुकाराम महाराज आंधळे,ह.भ.प.अशोक नंदाजी महाराज, ह.भ.प. बालयोगी हरिहर महाराज आणि ह.भ.प.केशव महाराज गीते शास्त्री यांची कीर्तन सेवा होणार आहे.तसेच दि. ५ सप्टेंबर रोजी ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांच्या सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत अमृततुल्य काल्याचे कीर्तन व त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या सप्ताहासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा,असे आवाहन समस्त गावकरी मंडळी व भजनी मंडळ,मौजे गप्पेवाडी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्रद्धा वाघमारे यांची मॉरिशसमधील बँकेत अनुपालन अधिकारीपदी निवड

## मराठी पत्रकार संघ व ग्रामस्थांच्या वतीने भव्य सत्कार,चिकना येथे डीजेच्या तालावर जल्लोषात मिरवणूक

धर्माबाद / अशोक पडोळे

तालुक्यातील चिकना येथील रहिवासी, ग्राम रोजगार सेवक तथा मराठी पत्रकार संघाचे सचिव गणेश शंकरराव वाघमारे यांची ज्येष्ठ कन्या श्रद्धा गणेश वाघमारे हिने आपल्या मेहनत, जिद्द, बुद्धिमत्ता आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तिची मॉरिशस येथील स्टँडर्ड बँक ऑफ मॉरिशसमध्ये अनुपालन अधिकारी म्हणून निवड झाली आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत आंतरराष्ट्रीय स्तरावरील बँकेत महत्त्वाची जबाबदारी मिळविल्याने चिकना तसेच धर्माबाद तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

श्रद्धा वाघमारे हिने सी.आय.ए. इन्स्टिट्यूट ऑफ अमेरिका अंतर्गत घेण्यात आलेल्या लेखी




परीक्षेत यश संपादन केले. तिच्या शैक्षणिक गुणवत्तेची, अभ्यासू वृत्तीची आणि व्यावसायिक कौशल्याची दखल घेत तिची अनुपालन अधिकारी पदासाठी निवड करण्यात आली.आंतरराष्ट्रीय बँकिंग क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाल्याने तिच्या या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

श्रद्धाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शहरातील फुलेनगर येथे रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले आणि भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तर धर्माबाद मराठी पत्रकार संघाच्या वतीने मराठी संघाचे जिल्हा उपाध्यक्ष जी.पी.मिसाळे, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष सुदर्शन वाघमारे, दक्षता समिती सदस्य तथा पत्रकार गंगाधर धडेकर, किशन कांबळे, नगरसेवक प्रतिनिधी शुध्दोधन हनमंते, भारतीय बौद्ध महासभा माजी तालुकाध्यक्ष सदानंद देवके, तालुका अध्यक्ष कैलास डूमणे, सचिव माधवराव वाघमारे कागंठीकर,यादव चाबुकस्वार, वृक्षप्रेमी शंकरराव कांबळे , जगदीप पवार ,प्रथ्वीराज चाबुकस्वार , देविदास धोतरे,यांच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, श्रद्धा आपल्या मूळ गावी चिकना येथे पोहोचताच ग्रामस्थांच्या वतीने तिचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. गावकऱ्यांनी डीजेच्या तालावर जल्लोषपूर्ण वातावरणात भव्य मिरवणूक काढून तिचा सत्कार केला. महिला, युवक, ज्येष्ठ नागरिक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने या स्वागत सोहळ्यात सहभागी झाले होते. गावातील मुलीने परदेशातील प्रतिष्ठित बँकेत महत्त्वाच्या पदावर निवड होऊन गावाचे नाव उज्ज्वल केल्याबद्दल ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला.

# अंकुशराव टोपे महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

## गुणवंत खेळाडूंना संधींची माहिती कबड्डी खो-खो व्हॉलीबॉलसह १०० मीटर धावण्याच्या स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद

जालना शेख फारुक :- हॉकीचे जादूगार आणि महान भारतीय खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या १२१ व्या जयंतीनिमित्त अंकुशराव टोपे महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतानाच गुणवंत खेळाडूंसाठी उपलब्ध असलेल्या विविध संधींची माहिती यावेळी देण्यात आली.कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य प्रा.पांडुरंग खोजे, प्राचार्य डॉ.अलका मंडलिक तसेच क्रीडा विभागप्रमुख डॉ. भुजंग डावकर यांच्या हस्ते मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभागप्रमुख डॉ.

भुजंग डावकर यांनी केले. महाविद्यालयाला गुणवंत खेळाडूंची समृद्ध परंपरा असून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या क्रीडा सुविधांचा प्रभावीपणे उपयोग करून क्रीडा क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करावी असे आवाहन त्यांनी केले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.दादासाहेब गजहंस यांनी मेजर ध्यानचंद यांच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचा आणि भारतीय क्रीडा क्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला.क्रीडा केवळ पदक किंवा स्पर्धेपुरती मर्यादित नसून त्यातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त आत्मविश्वास नेतृत्वगुण आणि संघभावना विकसित होते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबत क्रीडा क्षेत्रातही सातत्याने सहभाग नोंदवून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास



साधावा असे त्यांनी सांगितले.क्रीडा स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त महाविद्यालयात विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. अंतरमहाविद्यालयीन कबड्डी,खो-खो, व्हॉलीबॉल तसेच १०० मीटर धावण्याच्या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. मैदानावर विद्यार्थ्यांचा उत्साह आणि स्पर्धात्मक वातावरण पाहायला मिळाले.

मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या गुणवत्ता धोरणांतर्गत पंचसूत्री उपक्रमातील संस्कार दिन व मूल्यशिक्षण समिती च्या माध्यमातून इयत्ता अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनाही विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

जिल्हास्तरीय व राज्यस्तरीय गुणवंत खेळाडूंना उपलब्ध असलेल्या विविध संधी क्रीडा क्षेत्रातील प्रावीण्याचे महत्त्व तसेच विविध स्पर्धा परीक्षांमध्ये क्रीडा क्षेत्रातील कामगिरीचा होणारा उपयोग याबाबत प्रा.चंद्रकांत लाटेकर, डॉ.शंकर तिकांडे आणि प्रा. अंकुश गडदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. क्रीडा क्षेत्रात सातत्यपूर्ण कामगिरी केल्यास शिक्षण,नोकरी आणि स्पर्धात्मक क्षेत्रातही विविध संधी उपलब्ध होऊ शकतात, याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली.

कार्यक्रमास पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर, क्रीडाशिक्षक रविंद्र ढगे,प्रा. चंद्रकांत लाटेकर,डॉ.कार्तिक गावंडे,डॉ.पंडित रानमाळ, डॉ. रामदास वैद्य,डॉ.निखिल गायकवाड,डॉ.शंकर तिकांडे, कार्यालयीन अधीक्षक सुरेश ठेंग,डॉ.श्याम टकले, डॉ. बद्रीनाथ शिंदे,प्रा.दादासाहेब शिंदे,डॉ.प्रल्हाद गायकवाड, प्रा.अभिजीत थोरात,प्रा. बालाजी सूर्यवंशी,डॉ.विष्णू काळे,डॉ.प्रदीप लेकुरवाळे, डॉ.महेश डोईफोडे,डॉ. सुजाता पाटील,प्रा.ऐश्वर्या खडके,प्रा.शुभांगी राऊत,प्रा. ज्योत्स्ना भालेराव,रघुनाथ शिंदे यांच्यासह प्राध्यापक विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकार संरक्षण समितीच्या नव्या कार्यकारिणीकडे पत्रकारांचे लक्ष

## जालना जिल्हा व अंबड तालुक्यात लवकरच पदाधिकाऱ्यांची घोषणा

जालना/ प्रतिनिधी :

पत्रकारांच्या हक्कांचे संरक्षण, पत्रकारांवरील अन्याय-अत्याचाराविरोधात आवाज उठविणे तसेच पत्रकारांच्या विविध अडचणींच्या काळात त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या पत्रकार संरक्षण समितीच्या जालना जिल्हा व अंबड तालुका नवीन कार्यकारिणीची घोषणा लवकरच करण्यात येणार आहे.

पत्रकार संरक्षण समितीचे जालना जिल्हाध्यक्ष अशोक गाढे यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर संघटितपणे काम करण्याची तयारी सुरू आहे. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. मात्र, वृत्तसंकलन करताना पत्रकारांना दबाव, धमक्या, गैरवर्तन तसेच विविध अडचणींना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत पत्रकारांच्या पाठीशी सक्षमपणे उभे राहणारी संघटना आवश्यक असल्याचे मत मातोश्री कृषी पर्यटन केंद्र लालवाडी येथे झालेल्या बैठकीत व्यक्त करण्यात आले.

जिल्ह्यात पत्रकारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न, शासकीय पातळीवरील अडचणी, पत्रकारांवरील अन्याय तसेच पत्रकारितेच्या क्षेत्रातील विविध समस्यांवर संघटितपणे आवाज उठविण्याची भूमिका समितीच्या माध्यमातून घेतली जाणार आहे.

अंबड तालुका कार्यकारिणीत अनुभवी व सक्रिय पत्रकारांना संधी देण्याबाबत चर्चा सुरू असून, अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव यांसह विविध पदाधिकाऱ्यांची अधिकृत घोषणा लवकरच होणार आहे. त्यामुळे कोणाची वर्णी लागणार, याबाबत पत्रकारांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

नव्या कार्यकारिणीसमोर पत्रकारांच्या प्रश्नांवर प्रशासनाशी समन्वय साधणे, अन्यायाच्या घटनांमध्ये तत्काळ हस्तक्षेप करणे आणि पत्रकारांच्या न्याय्य मागण्यांसाठी संघटितपणे पाठपुरावा करण्याचे महत्त्वाचे आव्हान असणार आहे. लवकरात जालना जिल्ह्यातील कार्यकारिणी जाहीर होणार असल्याचे या बैठकीत सांगण्यात आले आहे.

# दावरवाडी येथील महिलांची पावसासाठी १८ किमी कावड कलश यात्रा...!

## पैठणच्या गोदावरीचे पाणी आणून महादेवाला जलाभिषेक

दावरवाडी प्रतिनिधी /

गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने पाठ फिरवल्याने शेती पिके धोक्यात आली आहेत. खरीप हंगामातील पिके माना टाकू लागल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर वरुणराजाला प्रसन्न करण्यासाठी दावरवाडी गावातील २५ ते ३० महिलांनी अनोखा संकल्प करत कावड कलश यात्रा काढली.



आज सकाळी या महिलांनी श्रीक्षेत्र पैठण येथील दक्षिण वाहिनी पवित्र गोदावरी नदीच्या पात्रातून कावड कलशामध्ये पवित्र जल भरले. डोक्यावर कलश घेऊन, हर हर महादेव आणि जय श्रीराम चा जयघोष करत महिलांनी पैठण ते दावरवाडी असा सुमारे १८ किलोमीटरचा खडतर पायी प्रवास पूर्ण केला.संध्याकाळच्या सुमारास ही कावड यात्रा दावरवाडी येथील जागृत व प्रसिद्ध असलेल्या श्रीराम मंदिर व महादेव मंदिरात पोहोचली. येथे महिलांनी आणलेल्या गोदावरीच्या पवित्र पाण्याने महादेवाच्या पिंडीवर जलाभिषेक केला. त्यानंतर महादेवाची महाआरती करण्यात आली.यावेळी उपस्थित सर्व दावर वाडीतील महिला व भाविकांनी महादेवाला आर्त साकडे घातले की, गेल्या दोन महिन्यांपासून पाऊस नाही, शेतातील पिके करपून चालली आहेत. देवा पाऊस पाड आणि बळीराजाला सुखाचे दिवस येऊ दे.या धार्मिक कलश यात्रेमुळे संपूर्ण दावरवाडी गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. गावातील ग्रामस्थांनी या महिलांच्या श्रद्धेचे आणि जिद्दीचे कौतुक केले. पावसासाठी महिलांनी घेतलेला हा पुढाकार चर्चेचा विषय ठरला आहे. दावरवाडी येथील महिलांनी पैठणहून गोदावरीचे पाणी कावडीतून १८ किमी पायी

# तहसीलच्या गाडीला खड्ड्यांचा दणका

## जाफराबाद-सावरखेडा मार्गावर शासकीय बोलेरो नाल्यात पलटी जीवितहानी टळली मात्र रस्ते विकासाचे पितळ उघडे

जाफराबाद इसराखान पठाण :- रस्ते विकासाच्या मोठमोठ्या घोषणा आणि प्रत्यक्षातील खड्डेमय वास्तव यातील दरी पुन्हा एकदा समोर आली आहे. अहिल्यादेवी होळकर चौक ते सावरखेडा मार्गावर गुरुवारी दि.२८ ऑगस्ट सकाळी ११.२७ वाजता जाफराबाद तहसील कार्यालयाच्या शासकीय बोलेरो वाहनाचा अपघात झाला.चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने वाहन रस्ता सोडून बाजूच्या खोल नाल्यातील पाणथळ जागेत जाऊन पलटी झाले.सुदैवाने वाहनातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना गंभीर दुखापत झाली नाही. मात्र या घटनेने ग्रामीण रस्त्यांच्या दुरवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.अपघाताची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. वाहनाचे मोठे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. शासकीय यंत्रणेचेच वाहन रस्त्याच्या दुरवस्थेचा बळी ठरल्याने आता प्रशासनाच्या रस्ते विकासाच्या दाव्यांवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अधिकारी-कर्मचाऱ्यांची गाडी नाल्यात शेतकऱ्यांचा उद्रेक

या घटनेनंतर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. वर्षानुवर्षे ग्रामीण रस्त्यांची दुरवस्था कायम असताना पावसाळ्यात परिस्थिती अधिकच गंभीर होते. खड्डे,चिखल,पाणथळ जागा आणि खचलेले रस्ते यामुळे वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे.

आज तहसील कार्यालयाची गाडी अपघातग्रस्त झाली म्हणून प्रशासनाचे लक्ष या रस्त्याकडे गेले.पण आम्ही तर रोज याच रस्त्यावरून जातो. आमची वाहने आमचा शेतमाल आमची मुले आणि आमचा जीव धोक्यात असताना प्रशासनाला हे खड्डे दिसत नाहीत का? असा संतप्त सवाल शेतकऱ्यांनी उपस्थित केला.

शेतकऱ्यांच्या संतापाला या अपघाताने नवा आवाज मिळाला आहे.

तहसीलदार साहेब आज तुमच्या गाडीचा अपघात झाला आणि सुदैवाने जीव वाचला हे चांगले झाले.पण आम्ही शेतकरी दररोज या रस्त्यावर जीव धोक्यात घालतोय.आमचा जीव कधी वाचणार? असा सवाल आता थेट प्रशासनाला विचारला जात आहे.पांदण रस्त्यांच्या विकासाचे दावे कागदावरच

पांदण रस्ते शेतरस्ते आणि ग्रामीण मार्गांच्या विकासासाठी विविध योजनांतून निधी उपलब्ध होत असल्याचे प्रशासनाकडून सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात अनेक मार्गांची अवस्था आजही दयनीय असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.पावसाळ्यात परिस्थिती आणखी बिकट



होते.शेतमाल बाजारपेठेत नेण्यासाठी ट्रॅक्टर,बैलगाडी अथवा इतर वाहने घेऊन जाणेही कठीण बनते.गंभीर रुग्णाला दवाखान्यात नेण्यासाठी रुग्णवाहिकेलाही अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांसह महिला ज्येष्ठ नागरिक आणि शेतमजुरांनाही या रस्त्यांचा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.अवजड वाळू वाहतुकीमुळे रस्त्यांची चाळण

या परिसरातील अवजड वाळू वाहतुकीमुळे ग्रामीण रस्त्यांची आणखी दुरवस्था होत असल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला आहे. क्षमतेपेक्षा अधिक भाराची वाहने या मार्गावरून धावत असल्यास रस्त्यांच्या टिकाऊपणावर परिणाम होतो असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

मात्र, अवजड वाहतुकीवर नियंत्रण कोणाचे? रस्त्यांची पाहणी कोण करणार? आणि रस्ते खराब झाल्यानंतर दुरुस्तीची जबाबदारी कोणाची? हे प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

कागदावरील विकास नको; प्रत्यक्ष पाहणी करा

रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे केवळ कागदोपत्री दाखविण्याऐवजी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

अहिल्यादेवी होळकर चौक ते सावरखेडा मार्गाची तातडीने पाहणी करून खड्डे बुजवावेत पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी आणि धोकादायक ठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी जोर धरू लागली आहे.

तहसील कार्यालयाच्या शासकीय वाहनाचा अपघात हा केवळ एक अपघात म्हणून दुर्लक्षित करण्याचा प्रकार नसून ग्रामीण रस्त्यांच्या वास्तवाचा इशारा मानला जात आहे. आज सुदैवाने जीवितहानी टळली मात्र पुढील वेळी अशीच घटना घडेल याची हमी कोण देणार प्रशासन आता तरी जागे होणार की आणखी एखाद्या जीवितहानीची वाट पाहणार? असा संतप्त सवाल नागरिकांतून केला जात आहे.



# कचरा नाही, कला आहे! पानाफुलांची किमया आहे!

टाकाऊ वस्तूंपासून विद्यार्थ्यांनी साकारल्या आकर्षक राख्या

बदनापूर ,-(प्रतिनिधी )

रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर गुरूकुलम् शिशुवाटीका, बदनापूर येथे विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक राख्या तयार करण्याचा अनोखा उपक्रम घेण्यात आला. झाडांची पाने-फुले, धागे-दोरे तसेच कागद, पेन्सिलचा कचरा यांसारख्या टाकाऊ वस्तूंचा कल्पकतेने वापर करून विद्यार्थ्यांनी आकर्षक राख्या तयार करण्याचे प्रशिक्षण घेतले.प्लास्टिकच्या वस्तू सहजपणे नष्ट होत नसल्याने पर्यावरणावर त्याचा विपरीत परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण व्हावी, तसेच 'टाकाऊपासून टिकाऊ' या संकल्पनेची ओळख व्हावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

विद्यार्थ्यांनी पानाफुलांपासून तसेच उपलब्ध टाकाऊ साहित्यापासून विविध रंगांच्या व आकर्षक राख्या तयार केल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव मिळण्याबरोबरच त्यांना पर्यावरणपूरक वस्तू तयार करण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. बाजारातून राख्या खरेदी करण्याऐवजी स्वतःच्या हाताने राखी तयार करण्याचा आनंदही विद्यार्थ्यांनी अनुभवला.

पानाफुलांपासून राख्या तयार केल्यामुळे विद्यार्थ्यांना झाडांचे महत्त्व समजते आणि पर्यावरणाविषयी जिव्हाळा निर्माण होतो. तसेच कागद, पेन्सिलचा कचरा यांसारख्या टाकाऊ वस्तूंचा उपयोग करून टिकाऊ वस्तू निर्माण करता येतात, हा संदेश विद्यार्थ्यांना या उपक्रमातून मिळतो. स्वतः राखी तयार केल्यामुळे त्यांचा खर्चही वाचतो आणि त् येथेयांच्या कल्पकतेला वाव देत नवीन काहीतरी शिकण्याची संधी मिळते. अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची संस्कारक्षम भावना रुजते.

अश्विनी डिघे
( मुख्याध्यापिका)

# स्वतःसाठी थोडं जगायला शिका...

पिंपरी पुणे – आपण आयुष्यभर कोणासाठी ना कोणासाठी जगत असतो...आई-वडिलांसाठी, मुलांसाठी, कुटुंबासाठी, मित्रांसाठी... प्रत्येकाच्या आनंदाची, प्रत्येकाच्या गरजेची काळजी घेत असतो.पण या सगळ्यांमध्ये एक व्यक्ती मात्र नकळत मागे राहते ती म्हणजे आपण स्वतः. दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर हसू आणताना आपल्या मनात किती वेदना आहेत, हे आपण अनेकदा स्वतःपासूनही लपवतो.सगळ्यांसाठी वेळ काढताना स्वतःसाठी मात्र वेळच उरत नाही.पण लक्षात ठेवा...

स्वतःची काळजी घेणं स्वार्थीपणाचं लक्षण नाही; तर स्वतःवर प्रेम करण्याची सुरुवात आहे. कधी स्वतःसाठी शांत बसावं... कधी मनसोक्त हसावं... कधी एखादं आवडतं पुस्तक वाचावं... कधी आवडतं संगीत ऐकावं... मनाला आवडत असेल तर फिरायला जावं.... निसर्गाच्या सानिध्यात काही क्षण घालवावेत... हिरवाईकडे पाहावं, पक्ष्यांचा आवाज ऐकावा,

गार वाऱ्याची झुळूक अनुभवावी... कधी एखाद्या मनमोकळ्या जागी जाऊन मनात साचलेले विचार मोकळे करावेत.कारण प्रत्येक वेळी समस्येचं उत्तर शोधणं गरजेचं नसतं; कधी कधी मनाला फक्त मोकळं होऊ देणंही गरजेचं असतं. आणि हो..जे आपल्याला आवडतं, पण त्याचबरोबर जे आपल्या आयुष्यासाठी चांगलं आहे, ते नक्की करा.



कारण स्वतःसाठी जगणं म्हणजे मनाला वाटेल ते काहीही करणं नाही...

तर जे आपल्या मनाला आनंद देतं, मनाला शांतता देतं, आपल्याला आतून समृद्ध करतं आणि आपल्या आयुष्याला सुंदर दिशा देतं, ते निवडणं.आपल्यावर कोणी प्रेम करावं, आपली काळजी घ्यावी, आपल्याला समजून घ्यावं, आपली किंमत ओळखावी... अशी अपेक्षा असणं स्वाभाविक आहे.पण त्या अपेक्षांच्या ओझ्याखाली स्वतःचं आयुष्य जगायला विसरू नका.आपल्यावर कोणी प्रेम करावं, या विचारात आणि अपेक्षेत आयुष्य घालवण्यापेक्षा

स्वतःवर प्रेम करायला शिका.कोणी आपल्याला निवडलं किंवा नाही, कोणी आपली किंमत ओळखली किंवा नाही, कोणी आपल्यासोबत राहिलं किंवा नाही...यामुळे आपली किंमत कमी होत नाही. कारण आपली किंमत दुसऱ्याच्या प्रेमावर अवलंबून नसते.

कधी स्वतःला आरशात पाहून मनापासून म्हणावं

मीही महत्त्वाची आहे...

माझ्या भावनांनाही किंमत आहे... माझ्या स्वप्नांनाही महत्त्व आहे...आणि मला देखील आनंदाने जगण्याचा अधिकार आहे. आपल्या आयुष्यात काही अपूर्ण राहिलं असेल,काही स्वप्नं तुटली असतील, काही नाती मागे राहिली असतील... तरीही आयुष्य थांबत नाही.तुटलेल्या गोष्टींच्या आठवणीत आयुष्य घालवण्यापेक्षा, उरलेल्या आयुष्यात स्वतःसाठी सुंदर क्षण निर्माण करा.स्वतःला दोष देणं थांबवा. स्वतःची तुलना करणं थांबवा.प्रत्येक वेळी स्वतःला सिद्ध करण्याची गरज नाही.कधी स्वतःचा हात स्वतःच धरावाआणि स्वतःला सांगावं मी तुझ्यासोबत आहे... काहीही झालं तरी. आणि मग स्वतःशी एक सुंदर वचन करा

मैं अपनी ऋ्रीळींश हूँ...होय...

मी स्वतःची ऋ्रीळींश आहे. माझ्या गुणांसह, माझ्या कमतरतांसह, माझ्या चुका, माझ्या संघर्षांसह, माझ्या अपूर्णतेसह...

मी स्वतःला स्वीकारते. मी स्वतःची कदर करते. मी स्वतःवर प्रेम करते. कारण स्वतःवर प्रेम करणं म्हणजे अहंकार नाही... तर स्वतःच्या अस्तित्वाचा आणि भावनांचा सन्मान आहे.

आणि स्वतःवर प्रेम करणं म्हणजे फक्त स्वतःसाठी सुंदर गोष्टी करणं नाही, तर आपल्या मनाची, शरीराची आणि आयुष्याचीही काळजी घेणं आहे.

म्हणून निरोगी रहा... आनंदी रहा..,खुश रहा...आणि मनापासून जगा. भूतकाळ बदलता येत नाही आणि भविष्य आपल्या हातात नाही... म्हणून आपल्या हातात असलेल्या आजच्या दिवसाला आणि या क्षणाला मनापासून जगा.

काल निघून गेला...उद्या अजून आलेला नाही...

पण आजचा क्षण आपल्या हातात आहे. म्हणून आज हसा...

आज फिरा... आज निसर्गाचा आनंद घ्या... आज आपल्या आवडत्या माणसांशी मनमोकळं बोला...

आणि कधी कधी स्वतः सोबतही सुंदर वेळ घालवा.

कारण आयुष्य खूप मोठं आहे असं वाटतं, पण खरं तर ते खूप छोटं आणि अनिश्चित आहे. गेलेला क्षण पुन्हा परत येत नाही...

आणि मिळालेलं जीवन पुन्हा पुन्हा जगता येत नाही. जीवन पुन्हा भेटत नाही...

म्हणून मिळालेल्या या आयुष्याला तक्रारींपेक्षा आनंदाने, चिंतेपेक्षा समाधानाने, आणि दुःखापेक्षा आशेने जगा.

दुसऱ्यांच्या आयुष्यात आपली जागा शोधण्यापेक्षा स्वतःच्या आयुष्यात स्वतःसाठी एक सुंदर जागा निर्माण करा. कोणी तुमच्यावर प्रेम करेल याची वाट पाहत बसू नका...

स्वतःवर इतकं प्रेम करा की स्वतःची साथच तुम्हाला पुरेशी वाटू लागेल. आणि मग एक दिवस कोणी आपल्याला ऋ्रीळींश मानतं की नाही, याची चिंता उरणार नाही...

कारण मनापासून म्हणता येईल

मैं अपनी ऋ्रीळींश हूँ!

स्वतःवर प्रेम करा... स्वतःची कदर करा... वर्तमानात जगा... निरोगी आणि आनंदी रहा... कारण हे आयुष्य पुन्हा भेटणार नाही.

लेखिका :
प्रा. दिपाली नारायण बागनाईक
भूगोल प्राध्यापिका
डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालय, पिंपरी, पुणे – १८

# आ. सुरेश धस यांच्या महाआरोग्य शिबिरातून मोफत उपचार

## भीमराव गर्कळ यांना मिळाला मोठा दिलासा!

पाटोदा (विशेष प्रतिनिधी):

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार सुरेश धस यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या 'मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिरा'च्या माध्यमातून अनेक गरजू रुग्णांना जीवदान मिळत आहे. या शिबिराचा लाभ घेत भीमराव लक्ष्मण गर्कळ यांच्या डाव्या गालावरील गाठीवर यशस्वी मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली असून, त्यांना तब्बल सात वर्षांच्या त्रासातून कायमची मुक्ती मिळाली आहे.





भीमराव गर्कळ यांच्या डाव्या गालावर मागील सात वर्षांपासून एक मोठी गाठ होती. या त्रासामुळे त्यांचे दैनंदिन जीवन कठीण झाले होते. उपचारासाठी खासगी रुग्णालयांमध्ये तपासणी केली असता, शस्त्रक्रिया आणि इतर उपचारांसाठी सुमारे दीड लाख रुपयांपर्यंतचा खर्च सांगण्यात आला होता. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने एवढा मोठा खर्च करणे गर्कळ कुटुंबाच्या आवाक्याबाहेर होते.

दरम्यान, आ. सुरेश धस यांच्या संकल्पनेतून मतदारसंघात भव्य 'मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिर' आयोजित करण्यात आले. या शिबिरात भीमराव गर्कळ यांची नोंदणी करून तज्ज्ञ डॉक्टरांकडून संपूर्ण आरोग्य तपासणी करण्यात आली. शिबिराच्या माध्यमातून त्यांच्यावर अत्याधुनिक वैद्यकीय सुविधेसह मोफत व यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली आणि गालावरील गाठ सुरक्षितपणे काढण्यात आली.

दीर्घकाळापासून असह्य वेदना सहन करणाऱ्या भीमराव गर्कळ यांना ऐनवेळी मोफत व दर्जेदार उपचार मिळाल्याने त्यांनी आ. सुरेश धस आणि वैद्यकीय पथकाचे मनापासून आभार मानले. रुग्णांच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान आणि आनंद हीच या आरोग्य उपक्रमाची खरी फलश्रुती आहे, अशी भावना यावेळी स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# लिंबा (खांबा) ग्रामपंचायतीच्या भ्रष्टाचाराची चौकशी करा

गहिनीनाथ नागरगोजे यांची मागणी

बीड दि.२९ (प्रतिनिधी):

शिरूर कासार तालुक्यातील लिंबा (खांबा) येथील ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत सन २०२३- २४ ते सन २०२६- २७ या वर्षात १५ व्या वित्त आयोगातील केलेल्या कामामध्ये भ्रष्टाचार झाला आहे. सदर विविध कामाच्या निधी व खर्च या संदर्भात प्रत्यक्ष कामे आणि अभिलेखाची तपासणी करून संबंधितावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी लिंबा (खांबा) येथील गहिनीनाथ वामन नागरगोजे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



या संदर्भात गहिनीनाथ नागरगोजे यांनी म्हटले आहे की, ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय लिंबा (खांबा) तालुका शिरूर कासार येथे सन २०२३- २४, सन २४- २५, सन २५- २६ आणि सन २६- २७ या वर्षात १५ व्या वित्त आयोगातील विविध कामात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाला आहे. या सर्व कामांची चौकशी करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या संदर्भात निवेदनात पुढे म्हटले आहे की, ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत बसवण्यात आलेले एलईडी लाईट, पाणीपुरवठा योजना, जनावरासाठी कोंडवाडा, गावात आणि वस्तीवर बसवण्यात आलेली बाकडे आदी अनेक कामे न करताच बिल उचलण्यात आली आहेत. नाली बांधकाम आणि फेवर ब्लॉक मध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला आहे. मौजे लिंबा येथील जि. प. प्राथमिक शाळा फर्निचर व शाळेच्या प्रांगणात प्लेवर ब्लॉक बसविण्यात आलेले नाही. काम न करताच 'अव्वा ते सव्वा खर्च' दाखवण्यात आला आहे. प्रिंटर खरेदी तसेच इलेक्ट्रॉनिक साहित्यातही मोठ्या प्रमाणे गैरव्यवहार केला आहे. खांबा शाळेला फेवर ब्लॉक न बसवितात, देयक उचलण्यात आले आहे. या सर्व कामाची गांभीर्याने चौकशी करण्यात यावी अशी मागणी गहिनीनाथ नागरगोजे यांनी केली आहे.

# अंतरवाली सराटी येथे आंदोलनासाठी निघालेल्या बीडच्या आंदोलकाचा हृदयविकाराने मृत्यू

केज/प्रतिनिधी

मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली अंतरवाली सराटी येथे सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी जात असलेल्या बीड जिल्ह्यातील एका आंदोलकाचा हृदयविकाराच्या धक्क्याने मृत्यू झाला. सुग्रीव बापू शिंदे वय ५७,रा.नांदूरघाट,ता. केज असे मृत आंदोलकाचे नाव आहे.मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षणाच्या मागणी साठी अंतरवाली सराटी येथे आजपासून उपोषण सुरू केले आहे.या आंदोलनात सहभागी होण्यासाठी सुग्रीव शिंदे हे आपल्या सहकाऱ्यांसह वाहनातून अंतरवाली सराटीकडे निघाले होते.दरम्यान,गेवराई जवळ त्यांचे वाहन आले असता सुग्रीव शिंदे यांना अचानक हृदयविकाराचा तीव्र झटका आला.त्यांना तात्काळ उपचारासाठी नेण्याचा प्रयत्न करण्यात आला,मात्र त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती नातेवाइकांनी दिली.या घटनेमुळे नांदूरघाट परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# शेतकरी मरतोय सरकार झोपलंय

## करपलेल्या सोयाबीन-कापसावर सरकारचे पंचनामे कशाला आधीच कृत्रिम पावसाचा निर्णय घेतला असता तर पिके वाचली असती

परतूर पिराजी गायकवाड :-

मराठवाड्यात शेतकरी संकटाच्या खाईत लोटला जात असताना सरकार नेमके कोणाची वाट पाहत आहे शेतकऱ्यांची पिके करपून जावीत कर्जाचा डोंगर वाढावा आणि अखेर शेतकरी टोकाचे पाऊल उचलल्यानंतरच सरकारला जाग येणार आहे का? असा संतप्त सवाल महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने राज्य सरकारला केला आहे. जालना जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात पावसाने पाठ फिरवल्याने सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकरी अक्षरश हवालदिल झाला असून कृत्रिम पावसाबाबत तातडीने निर्णय घ्या आता केवळ आश्वासन नको, कृती हवी अशी घणाघाती मागणी मनसेच्या जालना जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे.

यंदाच्या पावसाळ्याचे ८२ दिवस उलटून गेले आहेत. मात्र मराठवाड्यातील अनेक भागांत समाधानकारक पाऊस झालेला नसल्याचा दावा मनसेने केला आहे. पावसाअभावी शेतातील जमिनीला भेगा पडत आहेत. सोयाबीनची वाढ खुंटली आहे कापसाची अवस्था बिकट झाली आहे. हजारो रुपये खर्च करून कर्ज काढून दिवसरात्र राबून शेतकऱ्यांनी उभी केलेली पिके आता त्यांच्या डोळ्यांसमोर करपण्याच्या अवस्थेत आली आहेत.

शेतकरी पिकांकडे पाहत नाही तो आपल्या कुटुंबाचे भवितव्य जळताना पाहत आहे अशी संतप्त प्रतिक्रिया मनसेने व्यक्त केली आहे.

४६ दिवस सरकारच्या दारात; फाईल कुठे अडकली

पावसाची परिस्थिती गंभीर होण्याची शक्यता लक्षात घेऊन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या जालना जिल्ह्याच्या वतीने १३ जुलै २०२६ रोजी उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे निवेदन देण्यात आले होते. मराठवाड्यात कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी तातडीने निर्णय घेण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली होती.मात्र २८ ऑगस्टपर्यंत तब्बल ४६ दिवस उलटून गेले तरी शासनाकडून ठोस निर्णय झालेला नाही असा आरोप मनसेने केला आहे.



निवेदन मिळाले की नाही मिळाले असेल तर त्यावर काय निर्णय झाला निर्णय झाला असेल तर अंमलबजावणी कुठे आहे आणि निर्णयच झाला नसेल तर शेतकऱ्यांनी कोणाकडे पाहायचे असे प्रश्न मनसेने उपस्थित केले आहेत.

सरकारकडे प्रशासन यंत्रणा तज्ज्ञ आणि निर्णय घेण्याची ताकद आहे. मात्र संकट डोळ्यासमोर दिसत असतानाही निर्णय घेण्यास विलंब होत असेल तर हा विलंब शेतकऱ्यांच्या भवितव्याशी खेळ असल्याचा आरोप मनसेने केला आहे.

कागदावर कृषिप्रधान शेतकऱ्याच्या बांधावर मात्र अंधार भारत कृषिप्रधान देश असल्याचे भाषणांमध्ये सांगितले जाते.शेतकरी हा देशाचा अन्नदाता असल्याचे गौरवाने बोलले जाते.मग हाच अन्नदाता पावसाच्या प्रतीक्षेत आभाळाकडे डोळे लावून बसला असताना त्याच्या मदतीला सरकार किती वेगाने धावून येते हा खरा प्रश्न आहे.सोयाबीन आणि कापूस ही मराठवाड्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेची प्रमुख पिके आहेत.या पिकांचे नुकसान म्हणजे केवळ शेतातील उत्पादनाचे नुकसान नाही तर शेतकरी कुटुंबाच्या संपूर्ण आर्थिक चक्राला बसलेला धक्का आहे.पीक नाही उत्पन्न नाही उत्पन्न नाही कर्जफेड नाही कर्जफेड नाही पुढचा हंगाम नाही या दुष्टचक्रात शेतकरी अडकत चालल्याचे मनसेने म्हटले आहे.

आज पीक उद्या पाणी

पावसाची कमतरता केवळ खरीप पिकांसाठी धोकादायक नाही.पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास भविष्यात विहिरी, तलाव बंधारे आणि इतर जलस्रोतांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. त्यामुळे आज शेतकऱ्यांच्या शेतात दिसणारे संकट उद्या गावागावातील पिण्याच्या पाण्याच्या संकटात बदलू शकते.आज सोयाबीन वाचविण्याची वेळ आहे उद्या पाण्यासाठी टँकर धावतील तेव्हा सरकार धावपळ करणार का? असा सवाल मनसेने केला आहे.कृत्रिम पावसाबाबत हवामान आणि तांत्रिक शक्यता तपासून शासनाने उपलब्ध पर्यायांचा तातडीने विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.१३ हजार ५९५ आत्महत्या... तरीही सरकारला धडकी भरत नाही? मनसेच्या म्हणण्यानुसार २०१४ ते २०२५ या उपलब्ध आकडेवारीनुसार मराठवाड्यात किमान १३ हजार ५९५ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली आहे. हा आकडा केवळ आकडा नाही प्रत्येक संख्येमागे एक कुटुंब एक घर एक संसार आणि असंख्य अश्रू आहेत.

अशा पार्श्वभूमीवर पाऊस पीक आणि कर्जाच्या संकटात पुन्हा शेतकरी अडकत असताना सरकारने अधिक संवेदनशीलतेने निर्णय घेणे आवश्यक असल्याचे मनसेने म्हटले आहे.

माध्यमांनो शेतकऱ्याचा आवाज कुठे आहे

मनसेने प्रसारमाध्यमांनाही थेट सवाल केला आहे. शेतकऱ्यांची पिके करपत असताना ग्रामीण महाराष्ट्राचा हा ज्वलंत प्रश्न किती वेळा चर्चेत येतो? टीआरपीच्या स्पर्धेत क्षुल्लक विषयांना तासन्तास प्रसिद्धी मिळते; मग शेतकरी शेती पाऊस, पाणी, कापूस आणि सोयाबीनचा प्रश्न चर्चेच्या केंद्रस्थानी का येत नाही?

पत्रकारिता ही लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ मानली जाते. त्यामुळे संकटात सापडलेल्या शेतकऱ्याचा आवाज बुलंद करणे ही माध्यमांची सामाजिक जबाबदारी असल्याचे मनसेने म्हटले आहे.आता पंचनामे नकोत तातडीची मदत हवी

शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यानंतर पंचनामे अहवाल आणि बैठका यांची साखळी सुरू करण्यापेक्षा संकटाच्या काळात तातडीने मदत पोहोचणे गरजेचे आहे. सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत देण्यात यावी पर्जन्यमानाची वस्तुनिष्ठ पाहणी करावी आणि संभाव्य पाणीटंचाईवर आत्तापासूनच उपाययोजना कराव्यात अशी मागणी मनसेने केली आहे.

शेतकरी वाचला तर शेती वाचेल शेती वाचली तर अन्नसुरक्षा वाचेल. त्यामुळे सरकारने आता तरी जागे व्हावे. आकाशाकडे पाहणाऱ्या शेतकऱ्याला आणखी प्रतीक्षा करायला लावू नका. कृत्रिम पावसाबाबत तातडीने निर्णय घ्या आणि शेतकऱ्यांच्या बांधावर मदत पोहोचवा



# रक्षाबंधनानिमित्त जागर प्रतिष्ठानकडून अनोखी ओवाळणी

पात्रुड : रक्षाबंधनानिमित्त बहिणींच्या आरोग्याची काळजी घेत जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने अनोख्या सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. जागर प्रतिष्ठानच्या वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून जागर आरोग्यसखी अभियान राबविण्यात आले. या अभियानांतर्गत २५० महिलांना सॅनिटरी पॅडचे मोफत वाटप करण्यात आले.जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन चव्हाण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात महिलांच्या आरोग्याबाबत जनजागृती करण्यात आली. मासिक पाळीच्या काळात घ्यावयाची स्वच्छता, आरोग्याची काळजी तसेच मासिक पाळीशी संबंधित गैरसमज याबाबत महिलांना डॉ.जनक चौरे यांनी मार्गदर्शन केले .

यावेळी महिलांच्या आरोग्याची काळजी-हिच बहिणींच्या सन्मानाची राखी! हा संदेश देत रक्षाबंधनाचा उत्सव सामाजिक बांधिलकीने साजरा करण्यात आला. केवळ राखी बांधून न थांबता बहिणींच्या आरोग्यासाठी प्रत्यक्ष मदतीचा हात देण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात आला.

या उपक्रमाला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.जागर प्रतिष्ठानच्या या उपक्रमातून महिलांच्या आरोग्याचा प्रश्न समाजाच्या केंद्रस्थानी आणण्याबरोबरच गरजू महिलांना प्रत्यक्ष मदत करण्याचा आदर्श निर्माण झाला, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.या कार्यक्रमाला जागर प्रतिष्ठानचे अध्यक्ष किसन पाटील चव्हाण, डॉ. जनक चौरे, सरपंच मोमिन,ग्रामसेवक भागवत भुजबळ,विशाल जाधव,पत्रकार प्रकाश यादव,पप्पू मुंडे, गावातील सर्व आशा सेविका ,अंगणवाडी सेविका

# कवठेमहांकाळ उपजिल्हा रुग्णालयाची 'खरी वस्तुस्थिती' समोर आणण्याचा एक छोटासा प्रयत्न!

## उपजिल्हा रुग्णालय ठरतेय रुग्णांसाठी 'वरदान'!

डॉक्टर अजय भोसेकर यांच्या नेतृत्वाखाली रुग्णालयाचा कायापालट; स्वच्छ, सुंदर परिसरासह सुसज्ज वैद्यकीय सेवेला नागरिकांची साथ

सनी लोंढे, सांगली मीडिया




कवठेमहांकाळ तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांसाठी आरोग्यसेवेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले उपजिल्हा रुग्णालय आज रुग्णांसाठी आधारवड ठरत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. सुसज्ज वैद्यकीय सुविधा, डॉक्टरांची उपलब्धता, स्वच्छ व सुंदर परिसर आणि रुग्णाभिमुख वातावरणामुळे या रुग्णालयाबाबत नागरिकांमध्ये सकारात्मक भावना निर्माण होत आहे.

उपजिल्हा रुग्णालयाचा कारभार स्वीकारल्यानंतर डॉक्टर अजय भोसेकर यांनी रुग्णालयाच्या व्यवस्थेत सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी विशेष प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्यांच्या नेतृत्वाखाली रुग्णालयाच्या व्यवस्थेत विविध पातळ्यांवर सुधारणा करण्याचा प्रयत्न झाला असून, ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक पातळीवर दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, यासाठी भर दिला जात आहे.

स्वच्छता अन् सुंदर परिसराने बदलली रुग्णालयाची ओळख

रुग्णालय म्हटले की गर्दी, अस्वच्छता आणि गैरसोयीचे चित्र अनेकदा डोळ्यासमोर येते. मात्र, कवठेमहांकाळ उपजिल्हा रुग्णालयात स्वच्छता, नीटनेटकेपणा आणि सुंदर परिसर राखण्यावर दिलेले लक्ष नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहे.

रुग्णांसोबत येणाऱ्या नातेवाईकांनाही चांगले वातावरण मिळावे, यासाठी रुग्णालय परिसराची निगा राखण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यामुळे रुग्णालयाची एक वेगळी आणि सकारात्मक ओळख निर्माण होत आहे.

रुग्णकेंद्रित सेवेला प्राधान्य

ग्रामीण भागातील नागरिकांना किरकोळ उपचारांपासून गंभीर आजारांपर्यंतच्या उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागू नये, यासाठी स्थानिक पातळीवर सक्षम आरोग्यव्यवस्था असणे अत्यंत गरजेचे आहे.

या पार्श्वभूमीवर कवठेमहांकाळ उपजिल्हा रुग्णालयातील उपलब्ध वैद्यकीय सेवा आणि रुग्णकेंद्रित कामकाज नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरत आहे. डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि रुग्णालय प्रशासन यांच्या समन्वयातून रुग्णांना चांगली सेवा देण्याचा प्रयत्न होत असल्याने नागरिकांकडूनही समाधान व्यक्त होत आहे.

सोशल मीडियावरून रुग्णालयाच्या पाठीशी नागरिकांची खंबीर साथ!

या संपूर्ण विषयातील सर्वांत महत्त्वाची आणि वेगळी बाब म्हणजे सोशल मीडियाच्या माध्यमातून नागरिक पहिल्यांदाच कवठेमहांकाळ उपजिल्हा रुग्णालय आणि तेथील डॉक्टरांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहताना दिसत आहेत.

रुग्णालयाबाबत केवळ टीका किंवा आरोप करण्याऐवजी चांगले काम होत असेल तर त्याला साथ देण्याची भूमिका नागरिकांनी घेतल्याचे चित्र सोशल मीडियावरील चर्चेतून पुढे येत आहे.आरोग्यसेवेतील सकारात्मक कामाची नागरिकांकडून अशा प्रकारे सार्वजनिक पातळीवर दखल घेतली जाणे ही निश्चितच कौतुकाची बाब आहे. रुग्णालय आणि डॉक्टरांना नागरिकांची मिळणारी ही साथ रुग्णालय प्रशासनासाठी प्रोत्साहन देणारी ठरू शकते.

सांगली जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरणारी सकारात्मक बाब

कवठेमहांकाळ उपजिल्हा रुग्णालयाबाबत नागरिकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून व्यक्त केलेला पाठिंबा ही सांगली जिल्ह्यातील आरोग्य क्षेत्रातील एक वेगळी आणि सकारात्मक घटना म्हणून पाहिली जात आहे.एखाद्या शासकीय रुग्णालयाच्या कामाबाबत नागरिकांनी एकत्र येऊन सकारात्मक भूमिका घेणे, चांगल्या सुविधांची दखल घेणे आणि डॉक्टरांच्या प्रयत्नांना पाठबळ देणे, ही बाब निश्चितच उल्लेखनीय आहे.

सांगली जिल्ह्यासमोर आदर्श निर्माण करण्याची वाटचाल

डॉक्टर अजय भोसेकर यांच्या कार्यकाळात रुग्णालयाच्या व्यवस्थेत होत असलेल्या सकारात्मक बदलांमुळे कवठेमहांकाळ उपजिल्हा रुग्णालयाने सांगली जिल्ह्यात एक आदर्श निर्माण करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली असल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

रुग्णालयाची खरी वस्तुस्थिती समोर आणताना केवळ उणिवांवर बोट ठेवणे पुरेसे नाही; जे चांगले घडत आहे त्याचीही प्रामाणिकपणे दखल घेणे तितकेच आवश्यक आहे.ग्रामीण भागातील नागरिकांना चांगली आरोग्यसेवा मिळत असेल, डॉक्टर आणि कर्मचारी रुग्णांसाठी प्रयत्न करत असतील, तर त्या सकारात्मक कामाचे कौतुक होणे गरजेचे आहे.


'क्राइम डायरी'चा विशेष कटाक्ष

रुग्णालय हे केवळ इमारत नसते; ते हजारो नागरिकांच्या विश्वासाचे केंद्र असते.

कवठेमहांकाळ उपजिल्हा रुग्णालयाबाबत आज नागरिक सोशल मीडियाच्या माध्यमातून सकारात्मक भूमिका घेत आहेत, ही बाब विशेष महत्त्वाची आहे. उणिवा असतील तर त्या नक्कीच समोर यायला हव्यात; मात्र चांगले काम होत असेल तर त्यालाही समाजाने पाठबळ देणे आवश्यक आहे.

रुग्णहित सर्वांत महत्त्वाचे.

चांगल्या कामाला साथ, उणिवांवर विधायक आवाज आणि आरोग्यसेवेला बळ-हीच कवठेमहांकाळच्या नागरिकांची भूमिका असावी.



# बीडमध्ये होणार चवदार तळे ऐतिहासिक संघर्षाचा नाट्यप्रयोग

प्रवेश मोफत, नाट्यप्रयोगाचा आनंद घ्या

बीड/प्रतिनिधी

भारतीय सामाजिक इतिहासातील समता, स्वाभिमान आणि मानवी हक्कांच्या लढ्याला रंगमंचावर प्रभावीपणे साकारण्याचा प्रयत्न बीडमध्ये होणार आहे. महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाच्या ऐतिहासिक घटनेवर आधारित विशेष नाट्यप्रयोगाचे आयोजन सोमवार (दि.३१) ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कॅनॉल रोड, इंदिरा नगर, बीड येथे करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या माध्यमातून तसेच युगंधर क्रिएशन्स एल.एल.पी.निर्मित हा नाट्यप्रयोग सादर करण्यात येणार आहे. राजकुमार बडोले लिखित या नाटकाच्या माध्यमातून महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाच्या अनुषंगाने सामाजिक विषमता, जातिभेद, मानवी प्रतिष्ठा आणि समतेच्या संघर्षाचे चित्रण करण्यात आले आहे.

महाडच्या भूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली घडलेला चवदार तळे सत्याग्रह हा केवळ पाण्याच्या हक्कासाठीचा संघर्ष नव्हता; तो मानवी समानता आणि आत्मसन्मानासाठी उभा राहिलेला ऐतिहासिक लढा होता. याच संघर्षाची तीव्रता, तत्कालीन सामाजिक परिस्थिती आणि परिवर्तनाची धग नाट्यरूपातून प्रेक्षकांसमोर आणण्याचा प्रयत्न या प्रयोगातून करण्यात आला आहे.

नाटकाची निर्मिती शरद रा. बडोले यांनी केली असून सहनिर्माता गोविंद मोडक आहेत. नाटकाचे दिग्दर्शन प्रशांत निगडे यांनी केले आहे. या नाट्यप्रयोगात सशांक पांचाळ, अजित रांजणे, मयुरेश मढवी, दत्ता शेट्ये, अमोल जाधव, प्रेम जेटीथोर, अक्षता वराडकर, सायली नंदा, राजू भिलारे, तेजस राजे, मयुरी निकम, महादेव जाधव, मृणाल खिस्मतराव, अमोद करंदीकर यांनी भूमिका साकारल्या आहेत. या प्रयोगासाठी मोफत प्रवेश ठेवण्यात आला असून बीड शहरातील नागरिक, विद्यार्थी, सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि इतिहासप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# बुथ प्रमुखांनी चांगले काम केले, उद्याचा आमदार भारतीय जनता पक्षाचा - जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख

## गेवराई शहरात पार पडले एसआयआर प्रशिक्षण

गेवराई - गेवराई मतदारसंघातील भारतीय जनता पक्षाच्या बुथ प्रमुखांनी , कार्यकर्त्यांनी मतदान याद्यांचे सकोल पुनर्निरीक्षण एसआयआर च्या माध्यमातून उत्कृष्ट काम केले असून, याच जोरावर उद्याच्या निवडणुकीत निश्चितच आपल्या पक्षाचा आमदार निवडून येणार आहे. असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी येथे केले आहे. शुक्रवार ता. २८ रोजी सकाळी अकरा वाजता गेवराई येथे भारतीय जनता पक्षाच्या वतीने

गजानन लॉन्स सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या एसआयआर प्रशिक्षण कार्यशाळेच्या कार्यक्रमात ते बोलत होते.

व्यासपीठावर माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजपा नेते बाळराजे पवार, मराठवाडा संपर्क प्रमुख श्रीकांत सानप, रोहित पंडित, ड. रासकर, दत्ता जाधव, शिवराज पवार, यशराज पंडित, सचिन दाभाडे, प्रा.पीटी चव्हाण, नपचे उपाध्यक्ष ड. जिजा घुबार्डे, नपचे गटनेते राजेंद्र राक्षसभूवनकर, भरत गायकवाड, माजी नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, माजी नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे, नगरसेवक जिजा खंडागळे, सुंदर चव्हाण, प्रा. येळापुरे, रूपाली ताई कचरे,मनोज पाटील, शांतीलाल डोरले, माजी सभापती भरत गायकवाड, ड. नागेश तांबारे, प्रशांत रुईकर यांची उपस्थिती



होती. यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजपा नेते बाळराजे पवार, मराठवाडा संपर्क प्रमुख श्रीकांत सानप, ड. नागेश तांबारे यांनी ही मार्गदर्शन केले.यावेळी बोलताना देशमुख म्हणाले की, एसआयआर च्या माध्यमातून आपल्या कार्यकर्त्यांवर भारतीय जनता पक्षाने महत्त्वाची जबाबदारी टाकलेली आहे. पक्षाच्या सर्व बुथ प्रमुखांनी, कार्यकर्त्यांनी चोखपणे जबाबदारी पार पाडत, मतदार ओळखपत्राच्या माध्यमातून चांगले काम केले आहे. मतदारांना ज्या काही अडचणी आल्या ,त्या सोडविण्यासाठी मेहनत घेतली, पक्षाच्या आदेशाचे पालन करून एक चांगला आदर्श पाडल्याबद्दल त्यांनी सर्व कार्यकर्त्यांचे यावेळी बोलताना कौतुक केले.सूत्रसंचालन पत्रकार सुशिल टकले यांनी केले. आभार युवा नेते सचिन दाभाडे यांनी मानले. कार्यक्रमास गेवराई मतदारसंघातील बुथ प्रमुख, नपचे सभापती, नगरसेवक, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# वरुड बुद्रुकचे पोलीस पाटील आत्माराम वाघ यांचा जरांगे पाटील यांच्या हस्ते सत्कार

## जात वैधता समितीचा निर्णय ओबीसी प्रमाणपत्रावरील आक्षेप फेटाळला

भोकरदन इसरारखान पठाण :- तालुक्यातील वरुड बुद्रुक येथील नवनियुक्त पोलीस पाटील आत्माराम पाटील वाघ यांच्या ओबीसी जात प्रमाणपत्रावरील आक्षेप जात वैधता समितीने फेटाळून लावत प्रमाणपत्र वैध ठरविले. या निर्णयानंतर मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे आत्माराम वाघ यांचा शाल श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार केला.सुमारे दहा महिन्यांपूर्वी आत्माराम वाघ यांची ओबीसी प्रवर्गातून वरुड बुद्रुक गावच्या पोलीस पाटीलपदी निवड झाली होती. त्यांच्या जात प्रमाणपत्राबाबत काही व्यक्तींनी आक्षेप घेत ते खोटे व बनावट असल्याचा दावा केला होता. त्यामुळे वाघ यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागल्याचे सांगण्यात आले. तसेच त्यांच्या नियुक्तीबाबतही अनिश्चितता निर्माण झाली होती.

या पार्श्वभूमीवर वाघ यांनी जात पडताळणी समितीकडे त्यांच्या जातीशी संबंधित मूळ कागदपत्रे वंशावळ तसेच अन्य आवश्यक पुरावे सादर केले. समितीने कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर त्यांचे ओबीसी जात



प्रमाणपत्र वैध असल्याचा निर्णय दिला.

जात वैधता समितीचा निर्णय आल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आत्माराम वाघ यांना अंतरवाली सराटी येथे बोलावून घेत त्यांचा सत्कार केला. यावेळी त्यांनी वाघ यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी जरांगे पाटील यांनी जे सत्य आहे ते सत्यच राहणार. खोटे आरोप करून एखाद्याचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचा प्रयत्न चुकीचा आहे. आज सत्याचा विजय झाला आहे, अशी भूमिका व्यक्त केल्याचे सांगण्यात आले.दरम्यान जात प्रमाणपत्राबाबत झालेल्या वादावर समितीने दिलेल्या निर्णयामुळे आत्माराम वाघ यांना दिलासा मिळाला आहे. या निर्णयाचे वरुड बुद्रुकसह भोकरदन तालुक्यातील नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# मोसंबीची रोपे निघाली सदोष; शेतकऱ्यांना १२ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे नर्सरी मालकाला आदेश

## ॲड. ज्ञानेश्वर जाधव यांनी मांडली शेतकऱ्यांची भक्कम बाजू

बीड / गेवराई : भरघोस उत्पादनाच्या अपेक्षेने खरेदी करून लागवड केलेल्या मोसंबीच्या रोपांमधून अपेक्षित उत्पादन न मिळाल्याने दोन शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. मात्र, न्यायासाठी त्यांनी ग्राहक आयोगाची वाट धरत पुराव्यांसह आपली बाजू मांडली आणि अखेर त्यांना मोठा दिलासा मिळाला. बीड येथील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने गेवराई येथील नर्सरीकडून विक्री करण्यात आलेली मोसंबीची रोपे सदोष असल्याचे मान्य करत दोन शेतकऱ्यांना १२ लाख रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश नर्सरी मालकाला दिले आहेत. याशिवाय मानसिक व शारीरिक त्रास तसेच तक्रारीच्या खर्चापोटी आणखी ५० हजार रुपये देण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

हा महत्त्वपूर्ण निर्णय ग्राहक तक्रार क्रमांक ८२९/२०२४ मध्ये बीड जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने दिनांक २९ जुलै २०२६ रोजी दिला.मौजे गुळज, ता. गेवराई येथील शेतकरी गोरक्षनाथ पदमाकर चव्हाण व पदमाकर शिवदास चव्हाण यांनी गेवराई येथील तुकाई नर्सरीच्या मालकाविरुद्ध ग्राहक आयोगात तक्रार दाखल केली होती.

सन २०१९ मध्ये या शेतकऱ्यांनी आपल्या शेतात मोसंबीची बाग उभारण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांनी मोसंबीच्या भरघोस उत्पादन देणाऱ्या जातीची माहिती घेतल्यानंतर संबंधित नर्सरीकडून 'न्युसेलार' जातीची रोपे खरेदी केली होती. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, संबंधित रोपे १८ महिन्यांची असून लागवडीनंतर सुमारे अडीच वर्षांत फळधारणा सुरू होऊन मोठ्या प्रमाणात उत्पादन मिळेल, अशी माहिती त्यांना देण्यात आली होती.

शेतकऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने रोपांची लागवड केली. त्यानंतर खत, फवारणी, सिंचन, मशागत, खुरपणी, रोटावेटर तसेच बागेच्या नियमित देखभालीसाठी त्यांनी मोठा आर्थिक खर्च केला. काही झाडे मरल्याने त्यांच्या जागी नवीन रोपेही खरेदी करून लागवड करण्यात आली. डिसेंबर २०२३ पर्यंत मोसंबी बागेवर सुमारे ५ लाख ११ हजार रुपयांचा खर्च झाल्याचे तक्रारदारांनी आयोगासमोर नमूद केले.

मात्र, एवढा खर्च, मेहनत आणि बागेची निगा राखूनही अपेक्षित उत्पादन मिळाले नाही. तक्रारीनुसार सन २०२२ मध्ये केवळ २ टन, तर सन २०२३ मध्ये केवळ ५ टन मोसंबीचे उत्पादन झाले. अपेक्षित उत्पादनाच्या तुलनेत अत्यल्प उत्पादन मिळाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. दोन वर्षांतील उत्पादनातील तुटीमुळे २१ लाख ४५ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा तक्रारदारांनी केला होता.

न्यायासाठी शेतकऱ्यांनी ग्राहक आयोगात धाव घेतली. रोपे खरेदीची बिले, खर्चाच्या पावत्या, मोसंबी विक्रीच्या पावत्या, झाडांचे फोटो तसेच कृषी विभागाशी संबंधित अधिकाऱ्यांच्या पाहणी अहवाल व पंचनामे असे महत्त्वपूर्ण पुरावे आयोगासमोर सादर करण्यात आले.

आयोगाने आपल्या निर्णयात नमूद केले की, पाहणीदरम्यान अनेक झाडांमध्ये कमी प्रमाणात फळधारणा, पानांच्या आकारात बदल तसेच अपेक्षेपेक्षा कमी वाढ झाल्याचे दिसून आले. तसेच कृषी विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात आलेल्या पाहणी पंचनाम्यात संबंधित रोपांमध्ये भेसळीचे स्वरूप दिसून येत असल्याने फळांची वाढ व आकार लहान असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले होते.

या पुराव्यांचा विचार करून आयोगाने संबंधित नर्सरीकडून तक्रारदारांना सदोष रोपे विक्री करण्यात आली असून त्रुटीयुक्त सेवा देऊन अनुचित व्यापार प्रथेचा अवलंब करण्यात आल्याचे निष्कर्षात नमूद केले.प्रकरणात नर्सरी मालकास आयोगाकडून नोटीस पाठविण्यात आली होती. मात्र, नोटीस मिळूनही तो आयोगासमोर हजर झाला नाही. त्यामुळे प्रकरणाची सुनावणी एकतर्फी झाली आणि तक्रारदारांनी सादर केलेला पुरावा अबाधित राहिला.

तक्रारदारांनी एकूण २६ लाख ४५ हजार रुपयांची नुकसानभरपाई मागितली होती. मात्र, खर्च व नफ्याबाबत मागणी केलेल्या संपूर्ण रकमेचा पुरावा उपलब्ध नसल्याने आयोगाने संपूर्ण मागणी मंजूर न करता उपलब्ध पुरावे आणि मोसंबी पिकाच्या संभाव्य खर्च व उत्पन्नाचा विचार केला. त्यानुसार तक्रार अंशतः मंजूर करून शेतकऱ्यांना १२ लाख रुपये नुकसानभरपाई देण्याचे आदेश देण्यात आले. याशिवाय मानसिक व शारीरिक त्रास तसेच तक्रारीच्या खर्चापोटी ५० हजार रुपये देण्याचे आदेशही नर्सरी मालकाला देण्यात आले.आदेशाची प्रत प्राप्त झाल्यापासून ४५ दिवसांच्या आत ही रक्कम अदा करणे आवश्यक असून, आदेशाचे पालन न केल्यास तक्रार दाखल केल्याच्या तारखेपासून संपूर्ण रक्कम मिळेपर्यंत ९ टक्के दराने व्याज आकारण्यात येणार आहे.

ॲड. ज्ञानेश्वर जाधव यांची प्रभावी कामगिरी

लाखो रुपयांचा खर्च करूनही अपेक्षित उत्पादन न मिळाल्याने आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी या प्रकरणात ड. ज्ञानेश्वर (डी. ए.) जाधव पौळाचीवाडीकर यांनी तक्रारदार शेतकऱ्यांची बाजू प्रभावीपणे मांडली. रोपे खरेदीची बिले, कृषी अधिकाऱ्यांचे पाहणी अहवाल, पंचनामे, उत्पादन व खर्चासंबंधी कागदपत्रे आणि इतर उपलब्ध पुराव्यांच्या आधारे शेतकऱ्यांचे नुकसान आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

या प्रकरणात ड. कृष्णा लोंढे कोळगांवकर व ड. नितीन पवार, ड. गणेश गवारे यांनीही सहकार्य केले.मोसंबी बागेसाठी लाखो रुपये खर्च करूनही अपेक्षित उत्पादन न मिळालेल्या शेतकऱ्यांनी पुराव्यांच्या आधारे ग्राहक आयोगात न्यायाची लढाई लढली आणि अखेर त्यांना १२ लाख ५० हजार रुपयांचा दिलासा मिळाला. हा निर्णय सदोष कृषी रोपे किंवा त्रुटीपूर्ण सेवेमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा ठरू शकतो.

# कोमलवाडीच्या सुनेने कर्तृत्वाचा झेंडा गोंदिया जिल्ह्यात फडकवला!

गेवराई :गेवराई तालुक्यातील कोमलवाडी गावचे सुपुत्र श्री. शंकर सूर्यकांत धनवडे यांच्या पत्नी सौ. भाग्यश्री शंकर धनवडे यांची गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेवर शिक्षिका म्हणून निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे धनवडे कुटुंबीयांसह संपूर्ण कोमलवाडी गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. ग्रामीण भागातून आलेल्या सौ. भाग्यश्री धनवडे यांनी आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांच्या जोरावर हे उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शिक्षण क्षेत्रात शासकीय सेवेत दाखल होण्याचे स्वप्न त्यांनी पूर्ण केले असून, आता गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्या पार पाडणार आहेत.

शिक्षक म्हणजे केवळ नोकरी नव्हे, तर भावी पिढी घडविण्याची मोठी जबाबदारी. ही जबाबदारी स्वीकारण्याची संधी सौ. भाग्यश्री धनवडे यांना मिळाल्याने त्यांच्या यशाचे विशेष कौतुक होत आहे. त्यांच्या निवडीमुळे कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार तसेच कोमलवाडी ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कोमलवाडी गावाने विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाची छाप उमटविली असून, आता शिक्षण क्षेत्रातही धनवडे कुटुंबीयांनी गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. भाग्यश्री धनवडे यांच्या या यशामुळे गावातील इतर तरुण-तरुणींनाही शिक्षण आणि स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून पुढे जाण्याची प्रेरणा मिळणार आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल सौ. भाग्यश्री शंकर धनवडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन होत असून, गोंदिया जिल्ह्यातील त्यांच्या आगामी शैक्षणिक सेवेसाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



भाग्यश्री धनवडे यांची जिल्हा परिषद शाळेवर शिक्षिका म्हणून निवड

# मातावळी जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी

## श्री.प्रवीण बांगर तर उपाध्यक्षपदी सौ.मीरा बांगर यांची बिनविरोध निवड

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मातावळी, केंद्र मातकुळी, ता. आष्टी, जि. बीड येथील शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी श्री. प्रवीण नानाभाऊ बांगर, तर उपाध्यक्षपदी सौ. मीरा अनिल बांगर यांची पालक सदस्यांमधून बिनविरोध निवड करण्यात आली. दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी शाळेच्या परिसरात ही निवड प्रक्रिया उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदासाठी पालक सदस्यांमधून श्री. प्रवीण नानाभाऊ बांगर यांची, तर उपाध्यक्षपदासाठी सौ. मीरा अनिल बांगर यांची सर्व पालक सदस्यांच्या संमतीने बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी समितीच्या सदस्यपदी श्रीमती विद्या आजिनाथ बांगर, श्री. दिलीप गोविंद बांगर, श्रीमती कोमल दत्तात्रय माने, श्री. नामदेव बाबासाहेब बांगर, श्री. केशव रामदास बांगर, श्रीमती सुदामती अंबादास बांगर, श्रीमती सोनाली रमेश रणसिंग, श्री. सुनील एकनाथ खंडागळे, श्री. अंबादास विष्णू बांगर, श्रीमती शालिनी नितीन गायकवाड, श्रीमती आशाबाई रामहरी बांगर यांची पालक सदस्यांमधून बिनविरोध निवड करण्यात आली.




तसेच शिक्षक प्रतिनिधी म्हणून ज्येष्ठ शिक्षक श्री. भागवत वासुदेव शेकडे, अंगणवाडी प्रतिनिधी म्हणून श्रीमती रईसा निजाम पठाण, तर स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रतिनिधी म्हणून ग्रामपंचायत सदस्य श्री. सागर कांतीलाल बांगर यांची निवड करण्यात आली. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु. मनस्विनी अशोक बांगर आणि चि. श्रेयस दीपक यादव यांचा समितीत समावेश करण्यात आला.

शाळा व्यवस्थापन समितीच्या सचिवपदाचा कार्यभार ज्येष्ठ प्राथमिक पदवीधर शिक्षक तथा मुख्याध्यापक श्री. गोरक्षनाथ लाड हे पाहणार आहेत.नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सर्व सन्माननीय सदस्यांचा शिक्षक, पालक व ग्रामस्थांच्या वतीने यावेळी सत्कार करण्यात आला. शाळेच्या वतीने नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना शाल, पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष श्री. प्रवीण नानाभाऊ बांगर व उपाध्यक्ष सौ. मीरा अनिल बांगर यांच्यासह सर्व सदस्यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. शाळेच्या भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविणे, विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक व भौतिक सुविधा उपलब्ध करून देणे तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

संपूर्ण निवड प्रक्रिया शालेय व्यवस्थापन समितीचे सचिव तथा मुख्याध्यापक श्री. गोरक्षनाथ लाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. निवड प्रक्रिया यशस्वी करण्यासाठी ज्येष्ठ प्राथमिक पदवीधर शिक्षिका श्रीमती शैला जाचक, श्रीमती वर्षा मोटे, श्रीमती सुनीता बांगर, तसेच श्री. बाळासाहेब डोके व श्री. दत्ता झांजे यांनी विशेष परिश्रम घेतले.

या निवड प्रक्रियेस समाजसेवक श्री. अण्णा बांगर, श्री. अशोक बांगर (फिटर), श्री. लालचंद बांगर, श्री. बाळू आढाव, श्री. संदीप बांगर, श्री. अंबादास बांगर, श्री. दीपक यादव, श्री. बादशहा पठाण, श्री. संतोष माने, श्री. देविदास पोकळे, श्री. बाबासाहेब आनंदा बांगर, श्री. अब्बास पठाण, श्री. चरण आढाव, श्री. सुभाष बांगर, श्री. भगवान आढाव, श्री. दत्तात्रय बांगर, ग्रामपंचायत सदस्य श्री. राजेंद्र बांगर, श्री. सागर बांगर, श्री. नामदेव बांगर यांच्यासह महिला पालक श्रीमती सुदामती अंबादास बांगर, श्रीमती सारिका खंडागळे तसेच पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाच्या शेवटी ज्येष्ठ शिक्षक श्री. भागवत वासुदेव शेकडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. शालेय व्यवस्थापन समितीच्या नव्या पदाधिकाऱ्यांच्या बिनविरोध निवडीमुळे मातावळी गावात समाधानाचे वातावरण असून, त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेच्या विकासाला अधिक गती मिळेल, अशी अपेक्षा पालक व ग्रामस्थांनी व्यक्त केली.



## बबनराव गोविंदराव जगताप (अण्णा) यांचे वृद्धापकाळाने निधन

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) मराठवाडा भूषण, लोकनेते आ. सुरेश आण्णा धस यांचे स्वीय सहाय्यक सुभाष जगताप सर व सुनील जगताप सर यांचे वडील बबनराव गोविंदराव जगताप (अण्णा) यांचे बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी ३ वाजून १५ मिनिटांनी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने जगताप कुटुंबीयांसह गौखेल व परिसरावर शोककळा पसरली आहे.

बबनराव गोविंदराव जगताप (अण्णा) हे प्रेमळ, मनमिळावू आणि आपुलकीचा स्वभाव असलेले व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते. आपल्या कुटुंबाशी तसेच नातेवाईक, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक, आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांनी जगताप कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत शोक व्यक्त केला.

त्यांच्या पार्थिवावर गौखेल, ता. आष्टी, जि. बीड येथे बुधवार, दि. २६ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री १० वाजून ३० मिनिटांनी अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीसाठी राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच नातेवाईक, मित्रपरिवार, आप्तेष्ट आणि गौखेल ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून बबनराव जगताप (अण्णा) यांना अखेरचा निरोप दिला.

बबनराव जगताप (अण्णा) यांच्या निधनाने जगताप कुटुंबीयांनी आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ आणि आधारवड गमावला आहे. त्यांच्या पश्चात मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून निघणार नाही, अशा भावना अंत्यविधीस उपस्थित असलेल्या अनेकांनी व्यक्त केल्या. या दुःखद प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी जगताप कुटुंबीयांचे सांत्वन करून दिवंगत बबनराव गोविंदराव जगताप (अण्णा) यांच्या स्मृतींना श्रद्धांजली अर्पण केली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि जगताप कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे बळ देवो, अशी भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

# कॉपर वायर चोरांचा पर्दाफाश...!

## सोलापूर ग्रामीण गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई; ११ गुन्ह्यांची उकल

शेतातील इलेक्ट्रिक पंप, पानबुडी मोटार व केबल वायरमधील २३५ किलो कॉपर वायर जप्त; ३ लाख ४ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

सनी लोंढे सांगली मीडिया

शेतातील इलेक्ट्रिक पंप, पानबुडी मोटार आणि केबल वायरमधील कॉपर वायर चोरी करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांनी पर्दाफाश केला आहे. या कारवाईत एका आरोपीला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून २३५ किलो वजनाची कॉपर वायर जप्त करण्यात आली आहे. जप्त मुद्देमालाची किंमत ३ लाख ४ हजार २०० रुपये आहे. आरोपीच्या चौकशीत सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील तब्बल ११ चोरीच्या गुन्ह्यांची उकल झाली आहे.

पोलीस अधीक्षक श्री. अतुल कुलकर्णी यांनी सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात इलेक्ट्रिक पंप व पानबुडी मोटारीमधील कॉपर वायर चोरीच्या गुन्ह्यांची उकल करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय जगताप यांना दिले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक जगताप यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानदेव वाघ व त्यांच्या पथकाला तपासाच्या सूचना दिल्या.

त्यानुसार सपोनि ज्ञानदेव वाघ व त्यांचे पथक मोहोळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत सय्यद वरवडे येथे तपासासाठी असताना, पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत एका रेकॉर्डवरील इसमाबाबत माहिती मिळाली. सदर इसमाने मोहोळ, पंढरपूर व उत्तर सोलापूर तालुक्यात नदीपात्रालगतच्या पानबुडी मोटारी तसेच शेतातील इलेक्ट्रिक मोटारीमधील तांब्याची तार व केबल वायर चोरी केल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली.




मिळालेली माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय जगताप यांना कळविण्यात आली. त्यांच्या आदेशानुसार पथकाने सय्यद वरवडे येथे कारवाई केली.

बातमीतील संशयित त्याच्या राहत्या घराजवळील पांडिक खोलीजवळ बसलेला आढळून आला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपले नाव रविंद्र उर्फ रवि उर्फ गोट्या चंद्रकांत पवार (वय २५, रा. सय्यद वरवडे, ता. मोहोळ, जि. सोलापूर) असे सांगितले.

पोलिसांनी कौशल्यपूर्ण तपास केल्यानंतर आरोपीने मागील सहा महिन्यांपासून त्याचा साथीदार पपू शिंदे (रा. तांदुळवाडी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर) याच्या साथीने विविध गावांमध्ये रात्रीच्या वेळी शेतातून व नदीपात्रातून मोटारी, पानबुडी मोटारी आणि केबल वायर चोरल्याची कबुली दिल्याचे प्रेस नोटमध्ये नमूद आहे.चोरी केलेल्या मोटारी फोडून त्यातील केबल वायर जाळून तांब्याची तार वेगळी केली जात होती. त्यानंतर ही कॉपर वायर पॉलिथिनमध्ये भरून विक्री केली जात असल्याचे तपासात समोर आले. आरोपीच्या घरातील पांडिक खोलीत विक्रीसाठी ठेवलेले १३ तांब्याच्या तारांचे पुडे पोलिसांना मिळून आले.




# महावितरण ॲक्शन मोडमध्ये....!

सिंगल-फेजवर शेतीपंप चालवाल तर कारवाई अटळ..! कार्यकारी अभियंता विजय पाटील

सायंकाळी ६ ते रात्री १० घरगुती वीजपुरवठ्याचा 'पीक अवर'; कवठेमहांकाळसह मिरज-जत पूर्व भागात तपासणी मोहीम तीव्र

सनी लोंढे सांगली मीडिया

कवठेमहांकाळ तालुक्यासह मिरज-जत पूर्व भागात सिंगल-फेज वीजपुरवठ्यावर अनधिकृतपणे टू-फेज अथवा थ्री-फेज शेतीपंपाच्या मोटारी चालविल्याने घरगुती वीजपुरवठ्यावर अतिरिक्त ताण येत असल्याचे महावितरणच्या निदर्शनास आले आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत महावितरणने आता संबंधित भागात तपासणी मोहीम सुरू केली असून, नियमबाह्य वीजवापर करणाऱ्यांविरोधात ॲक्शन मोड स्वीकारला आहे.

महावितरणचे कार्यकारी अभियंता विजय पाटील यांनी शेतीपंपधारकांना नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. सिंगल-फेज वीजपुरवठ्यावर क्षमतेपेक्षा अधिक भार टाकून शेतीपंप चालविताना कोणी आढळल्यास नियमानुसार कडक कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला आहे.

सायंकाळी ६ ते रात्री १०... घरगुती ग्राहकांसाठी सर्वाधिक महत्त्वाचा काळ!सायंकाळी ६ ते रात्री १० हा घरगुती वीजवापराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा कालावधी आहे. या वेळेत घरांमध्ये दिवे, पंखे, टीव्ही, फ्रिज, पाणीपंप, विविध विद्युत उपकरणांचा वापर वाढतो. त्यामुळे वीजवाहिन्यांवर आधीच मोठा भार असतो.अशा परिस्थितीत सिंगल-फेज वीजपुरवठ्यावर क्षमतेपेक्षा जास्त भार टाकून शेतीपंपाच्या टू-फेज किंवा थ्री-फेज मोटारी चालविल्यास संबंधित वीजवाहिनीवर अतिरिक्त ताण निर्माण होतो.

त्याचा परिणाम परिसरातील घरगुती ग्राहकांच्या वीजपुरवठ्यावर होण्याची शक्यता असते. वीजपुरवठा खंडित होणे, कमी-जास्त दाब निर्माण होणे किंवा पुरवठ्यात वारंवार व्यत्यय येणे, अशा समस्या नागरिकांना भेडसावू शकतात.

विद्यार्थ्यांचा अभ्यास, ज्येष्ठ नागरिकांच्या गरजा, घरातील दैनंदिन कामकाज आणि नागरिकांच्या अत्यावश्यक गरजा लक्षात घेता सायंकाळचा वीजपुरवठा सुरळीत ठेवण्याला महावितरणने प्राधान्य दिले आहे.कवठेमहांकाळ तसेच मिरज-जत पूर्व तालुक्यातील काही भागांमध्ये सायंकाळच्या वेळेत सिंगल-फेज वीजपुरवठ्याचा वापर करून शेतीपंप चालविला जात असल्याचे महावितरणच्या निदर्शनास आले आहे.

या प्रकारामुळे वीजवाहिन्यांवर क्षमतेपेक्षा अधिक भार पडतो. परिणामी त्या परिसरातील घरगुती ग्राहकांच्या वीजपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता वाढते.त्यामुळे महावितरणने संबंधित भागात तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला असून, अनधिकृत वीजवापर करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.

'नियम तोडाल तर कारवाई अटळ!'

सिंगल-फेज वीजपुरवठ्याचा अनधिकृत वापर करून टू-फेज अथवा थ्री-फेज शेतीपंप चालविणे हा नियमबाह्य प्रकार असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे.अशा प्रकारचा अनधिकृत वीजवापर तपासणीदरम्यान आढळल्यास संबंधित ग्राहकांविरोधात विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम १३५ व १३८ अन्वये दंडात्मक तसेच फौजदारी कारवाई होऊ शकते.'काही वेळासाठीच मोटार चालवतो', 'कुणाला काय कळणार?' किंवा 'घरचीच वीज आहे' असा गैरसमज करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ग्राहकांनी आता सावध होण्याची गरज आहे.महावितरणची तपासणी मोहीम सुरू असून, अनधिकृत वीजवापर आढळल्यास संबंधित ग्राहकाला कारवाईला सामोरे जावे लागू शकते.एकाच्या चुकीचा फटका संपूर्ण गावाला नको!महावितरणची ही मोहीम केवळ कारवाई करण्यासाठी नसून, संपूर्ण वीजव्यवस्था सुरळीत आणि सुरक्षित ठेवण्याच्या उद्देशाने राबविली जात आहे.

# घुंगर्डे हादगावात खंडोबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

घुंगर्डे हादगाव बंडू शिंगटे :- अंबड तालुक्यातील घुंगर्डे हादगाव येथे खंडोबा उत्सव समिती आणि ग्रामस्थांच्या वतीने खंडोबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार २९ आणि रविवार ३० ऑगस्ट असे दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम होणार असून, यानिमित्त गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

शनिवार २९ ऑगस्ट रोजी सकाळी खंडोबा मूर्तीची नगरप्रदक्षिणा आणि वास्तूची महापूजा होणार आहे. त्यानंतर रात्री ९ वाजता वाघे मंडळींच्या जागरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

रविवार ३० ऑगस्ट रोजी सकाळी विधिवत खंडोबा मूर्तीची स्थापना होमहवन आदी धार्मिक विधी पार पडणार आहेत.धार्मिक विधीनंतर भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच रविवारी रात्री ९ वाजता आरबडी मंडळाच्या वतीने जागरणाचा कार्यक्रम होणार आहे.गावात नव्याने उभारण्यात आलेल्या खंडोबा मंदिरातील मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या धार्मिक कार्यक्रमास पंचक्रोशीतील तसेच गावातील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित




# ग्रामसभा रद्द करा अन्यथा वर्षातून एकच ग्रामसभा घ्या

परतूर पिराजी गायकवाड :-

ग्रामपंचायत स्तरावर वारंवार घेण्यात येणाऱ्या ग्रामसभांमुळे प्रशासकीय कामकाजावर मोठा परिणाम होत असून ग्रामपंचायतींच्या दैनंदिन कामकाजात अडथळे निर्माण होत असल्याचा दावा करीत महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिनियमातील तरतुदींमध्ये सुधारणा करून ग्रामसभा रद्द करावी अथवा वर्षातून केवळ एकच ग्रामसभा घेण्याची तरतूद करावी अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांकडे पत्रव्यवहार करून प्रभावी पाठपुरावा करावा अशी विनंती करणारे निवेदन माजी मंत्री तथा परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांना देण्यात आले.

ग्रामपंचायत स्तरावर विविध योजनांची अंमलबजावणी प्रशासकीय कामकाज दैनंदिन कार्यालयीन कामे तसेच नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा यावर ग्रामसभांच्या आयोजनामुळे परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ग्रामसभांच्या आयोजनासाठी लागणारा वेळ मनुष्यबळ आणि प्रशासकीय यंत्रणेवरील अतिरिक्त ताण याचा विचार करून ग्रामसभा घेण्याच्या विद्यमान तरतुदींचा पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे.ग्रामपंचायतींचे कामकाज सुरळीत आणि गतिमान करण्यासाठी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील संबंधित तरतुदींमध्ये आवश्यक सुधारणा करण्यात यावी.ग्रामसभा पूर्णपणे रद्द करणे शक्य नसल्यास वर्षातून केवळ एकच ग्रामसभा घेण्याची तरतूद करावी अशी भूमिका निवेदनातून मांडण्यात आली.



या मागणीसाठी मुख्यमंत्री महोदयांकडे तातडीने पत्रव्यवहार करून शासनस्तरावर प्रभावी पाठपुरावा करावा अशी अपेक्षा आमदार लोणीकर यांच्याकडे व्यक्त करण्यात आली आहे.कर्मचारी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

निवेदन देताना जालना जिल्हाध्यक्ष डी.बी.काळे, सरचिटणीस विनोद भगत, जिल्हा उपाध्यक्ष सी.जी. पालवे,मंठा तालुकाध्यक्ष पवार,परतूर तालुकाध्यक्ष बी. एस. चव्हाण,परतूर तालुका सचिव पी.एस.लाळे,पंचायत संचालक बी.जी.पिंपळे तसेच परतूरचे पी.एस.गवळी यांच्यासह संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय अडचणी आणि दैनंदिन कामकाजातील अडथळे लक्षात घेऊन शासनाने या मागणीचा गांभीर्याने विचार करावा अशी अपेक्षा निवेदनाद्वारे व्यक्त करण्यात आली आहे.